व्यवसायिक जागा भाडेतत्वावर उपलब्ध
अलिबाग एस.टी. स्टॅंडसमोर पहिला मजला १०००, दुसरा मजला १००० व तिसरा मजला ८५० चौ.चटईक्षेत्र जागा ऑफीस, बॅंक, क्लासेस, हॉस्पिटल तसेच फ्रेन्चायझीसाठी उपलब्ध.
फोन : ९५४५९८४६९९

कृषीवल

रायगड ॥ शुक्रवार, दिनांक १३ मे २०२२

किंमत ४ ₹

प्रवेश चालू आहेत ...
*ऑटोकॅड 2D,3D , इन्टीरिअर डिझायनिंग.(६महिने)
पात्रता : इयत्ता. १२ वी, आय.टी.आय. पासून पुढे
कोणतीही शाखा. *100% job Assistance.
Modular Courses :
C,C++, JAVA, HTML, DTP, TALLY.
COMPUTER HARDWARE MAINTENANCE.
-: संपर्क :-
कॉलेज ऑफ आय.आय.टी.अलिबाग
टाउन प्लॅनिंग ऑफिसच्या समोर, श्री विष्णु सिद्धराज बिल्डिंग पहिला मजला.
9970666369, 7387893327, 7798130869.

डोलवी एमआयडीसीला विरोध

। गडब । वार्ताहर । महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत पेण तालुक्यातील डोलवी औद्योगिक विकास क्षेत्रासाठी कारावं, गडब, डोलवी, वडखळ, बोरी ग्रामपंचायत परिसरातील बेणेघाट, कोलवे, वावे, डोलवी,खारकारावी, कारावं, खारमांचेळा, खारघाट या गावातील जमीन संपादित करण्यात येणार आहे. या भूसंपादनाला येथील शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला आहे.

॥ भूसंपादन मोजणीला तीव्र विरोध

॥ आक्रमक बळीराजाला मोजणी अधिकारी घाबरले

प्रकल्प रद्द करा:आ.जयंत पाटील

आ. जयंत पाटील यांनी देखील विधानपरिषदेत या प्रकल्पाला विरोध दर्शविला आहे व प्रकल्प रद्द करावा अशी मागणी शासनाकडे केली असल्यामुळे या प्रकल्पाला आमचा विरोध असल्याचे शेतकऱ्यानी सांगितले. शेतकरी आक्रमक झाले असल्याने तीव्र विरोध पाहता मोजणीचे अधिकारी कोलवे या ठिकाणी आलेच नाही.

कोलवे या ठिकाणी शेतकऱ्यांनी गुरुवारी एकत्र जमून या मोजणीला विरोध केला. यावेळी रायगड जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर म्हात्रे, पेण पंचायत समिती सदस्य प्रदीप म्हात्रे, निलेश म्हात्रे, विजय पाटील, सुशील कोठेकर, राजू पाटील, महेश पाटील, महेंद्र कोठेकर, गजानन पेढवी, प्रविण म्हात्रे, प्रभाकर पाटील आदींसह शेतकरी, महिला, शेकडो ग्रामस्थ उपस्थित होते. •› पान ५ वर

कोर्लई ग्रा.पं.च्या लोखंडी पाईप चोरी प्रकरणात
सरपंच प्रशांत मिसाळ यांचा संबंध असल्याचा आरोप

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

सरकारी मालमत्ता असलेल्या मुरुड तालुक्यातील कोर्लई ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पाणी पुरवठा करणारी सुमारे ११ किलोमीटरची लोखंडी पाईप लाईन काढून तिची चोरी करून विक्री करण्यात आली आहे. या संबंधात रेवदंडा पोलीस ठाण्यात तक्रार देवून देखील चोरट्यांविरोधात गुन्हे दाखल करण्यास रेवदंडा पोलीस टाळाटाळ करीत असल्याने ग्रा.पं. सदस्य आणि ग्रामस्थांनी थेट जिल्हा परिषदेच्या •› पान ५ वर

म/ह/त्वा/चे

संभाजीराजेंची स्वराज्य संघटना

पुणे : मी आतापर्यंत समाजाच्या हितासाठी लढलो आहे. पण, गेल्या काही वर्षांपासून मला खासदारकी मिळाली. त्यामध्ये अनेक कामं करता आली. समाजासाठी कामे करायची असेल तर सत्ता महत्त्वाची आहे. त्यामुळे मी येत्या काही दिवसांत होणारी राज्यसभेची निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे. पण, ही निवडणूक अपक्ष म्हणून लढवणार आहे, असं छत्रपती संभाजी राजे यांनी जाहीर केले.

राजीव कुमार मुख्य निवडणूक आयुक्त

नवी दिल्ली : राजीव कुमार यांची देशाचे नवे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ते १५ मे पासून या पदाचा ताबा स्वीकारणार आहेत. याबाबतची माहिती विधी आणि न्याय मंत्रालयाने दिली आहे. राजीव कुमार हे सध्याचे मुख्य निवडणूक आयुक्त सुशील चंद्रा यांची जागी घेतील. चंद्रा यांचा १४ मे रोजी कार्यकाल संपत आहे. त्यानंतर १५ मे रोजी राजीव कुमार मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून कार्यभार हाती घेतील. त्यांच्या नियुक्तीला राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी मंजुरी दिली आहे.

महाड : पूरनियंत्रणासाठी सीआरझेड परवानग्या

। महाड । प्रतिनिधी ।

गेल्या अकरा महिन्यांपासून महाड शहरात आलेल्या जुले एकवीस च्या महाप्रलय याकरिता कारणीभूत असलेल्या सभेची नदीपात्रातील गाळ व खाजगी जुट्टे काढण्यासंदर्भात महाड पूर निवारण समिती मार्फत शासनाकडे करण्यात आलेल्या मागणीला गुरुवारी(१२ मे) मोठे यश प्राप्त झाले असून पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत याबाबत आवश्यक असलेल्या सर्व परवानग्या देण्याची घोषणा करण्यात आली आहे

मंत्री आदित्य ठाकरे यांच्याकडे झालेल्या बैठकीला आ. भरत गोगावले, खा. सुनील तटकरे पालकमंत्री अदिती तटकरे यांसह पर्यावरण व संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी व पूर निवारण समितीसदस्य उपस्थित होते.

या संदर्भात पूर निवारण समितीच्या सदस्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार महाडवासीयांच्या असलेल्या या संदर्भातील मागण्या पुन्हा सभेच्या पटलावर ठेवण्यात आल्या. यावेळी शासकीय अधिकारी तसेच गोगावले यांनी आपल्या याबाबतच्या भूमिका स्पष्ट केल्या. महाड वासियांची मागील वर्षी झालेली बिकट परिस्थिती लक्षात घेऊन पूर निवारण समितीचे सदस्य व शासकीय अधिकाऱ्यांनी मांडलेल्या सविस्तर भूमिकेअंती आदित्य ठाकरे यांनी या संदर्भात नदीपात्रातील गाळ काढण्याकरिता आवश्यक असलेल्या सर्व परवानग्या देण्याची घोषणा करीत याबाबतची कायदेशीर औपचारिकता दोन दिवसांत पूर्ण केली जाईल असे स्पष्ट केल्याचे पूर निवारण समितीच्या सदस्यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

मान्सूनची जोरात वाटचाल

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

नैऋत्यू मोसमी पावसाची जोरदार वाटचाल सुरु आहे. असनी चक्रीवादळातही मान्सून या आठवड्यातच अंदमान बेटावर दाखल होणार असून तिसऱ्या आठवड्यात महाराष्ट्रात येणार आहे.असा अंदाज मध्यवर्ती वेधशाळेने वर्तविलेला आहे. पहिल्या आठवड्यात अंदमानात तो बरसणार असण्याची शक्यता आहे. यानंतर अरबी समुद्रावर आणि त्यापुढील आठवड्यात दक्षिण द्वीपकल्प आणि लगतच्या आग्नेय अरबी समुद्रात सरासरीपेक्षा जास्त पाऊस होणार आहे.

आमदारांना मोठे करण्याच्या प्रयत्नात
शिवसेनाप्रमुख, मुख्यमंत्री ठाकरे यांचा अपमान

। रोहा । प्रतिनिधी ।

अलिबाग विधानसभा मतदारसंघाचे शिवसेनेचे आमदार यांचा शुक्रवारी १२ मे रोजी वाढदिवस असल्याने बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे बॅनर अलिबाग विधानसभा क्षेत्रात सर्वत्र झळकवले आहेत. पण या बॅनरच्या माध्यमातून स्थानिक आमदारांना मोठे करण्याच्या प्रयत्नात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, हिंदुहृदयसम्राट स्व बाळासाहेब ठाकरे तसेच युवा सेना प्रमुख व मंत्री आदित्य ठाकरे तसेच कॅबिनेट मंत्री एकनाथ शिंदे यांची छायाचित्रे अतिशय छोट्या स्वरूपात बॅनरच्या एका कोपऱ्यात लावण्यात आल्याने मुख्यमंत्री तसेच हिंदुहृदयसम्राट •› पान ५ वर

पालकमंत्र्यांच्या आश्वासनाची ऐशीतैशी

॥ बेडिसगावचा रस्ता नव्या जागेतूनच

॥ ठेकेदाराच्या कृतीने ग्रामस्थ संतप्त

। नेरळ । प्रतिनिधी ।

पालकमंत्र्यांनी आश्वासन देऊनही कर्जत तालुक्यातील बेडीसगाव येथील दोन महिन्यांपूर्वी उखडून टाकलेला रस्ता ठेकेदाराने नवीन जागेतून बनविला आहे. जुना रस्ता होता त्याच जागेतून नेण्यात येईल असे आश्वासन पालकमंत्री अदिती तटकरे यांनी अलिबाग येथे रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बाहेर उपोषण करणाऱ्या आदिवासी लोकांना दिले होते. मात्र रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराने जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे शाखा अभियंता यांच्या मदतीने नवीन जागेतून रस्ता तयार करून घेतला आहे.

दरम्यान, रस्ता खोदून नव्या जागेतून केला जाऊ शकतो ही प्रथा आता रूढ होण्याची शक्यता असून बेडीसगाव आणि नऊ आदिवासी वाड्यांमधील लोकांची फसवणूक झाली आहे. बेडीसगाव रस्त्याचे काम करणारे ठेकेदार सिद्धिविनायक •› पान ५ वर

राज्यकर्त्यांना जनताच धडा शिकविले : पवार

। पुरंदर । प्रतिनिधी ।

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेली घटना ही आपली जमेची बाजू आहे. संविधानाने देशाला एकसंध ठेवल आहे, असे असूनही लोकशाही असलेल्या देशात लोकांच्या प्रश्नांकडे सरकारचे दुर्लक्ष होतं आहे, अशी खंत राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांनी व्यक्त केली आहे. देशातील जनता सुजाण आहे, राज्यकर्ते चुकल्यास ती योग्य तो धडा शिकवते, असा खोचक टोलाही पवारांनी विरोधकांना लगावला आहे. आज ते पुण्यातील पुरंदर येथे बोलत होते.

आमदारांच्या राजमळा येथील
स्विमींग पूलमध्ये कामगाराचा मृत्यू

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

अलिबाग मुरुडचे आमदार महेंद्र दळवी यांच्या अलिबाग तालुक्यातील राजमळा येथील बंगल्याच्या आवारातील जलतरण तलावात २१ वर्षीय कामगाराचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र हा अपघात की घातपात याबाबत जोरदार चर्चा सुरु आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, अलिबाग मुरूड

अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र दळवी यांच्या बंगल्यासमोर असणाऱ्या जलतरण तलावात यश प्रकाश घारु (वय २१ वर्षे) राहणार-कुरुळ, तालुका -अलिबाग, रायगड हा जलतरण तलाव साफ करण्यासाठी तलावात उतरला होता. मात्र त्याला पाण्याचा अंदाज न आल्याने तो त्यामध्ये बुडाला.

ही बाब बाजूला काम करीत असणाऱ्या दुसऱ्या कामगारांच्या लक्षात आली असता त्याने अन्य व्यक्तीच्या मदतीने बाहेर काढून अधिक उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले असता त्यास मृत घोषित करण्यात आले.

याबाबत अलिबाग पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली असून, अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय जाधव करीत आहेत.

पिसाळलेले माकड जेरबंद

। नेरळ । प्रतिनिधी ।

बारवी धरणाच्या परिसरात असलेल्या जंगलातील पिसाळलेले माकड बाजूच्या कारंद गावात ग्रामस्थांना त्रास देत होते. कारंद गावात धुमाकूळ घालणाऱ्या माकडाला बदलापूर येथील रेस्क्यू टीमने पकडून जंगलात नेऊन सोडले.

गेली सहा महिने या माकडाने स्थानिक ग्रामस्थांचेजगणे मुश्किल करून ठेवले होते.ग्रामस्थांच्या मागणीनंतर वन विभागाने देखील त्या पिसाळलेल्या माकडाला पकडण्यासाठी प्रयत्न केले. वन अधिकारी अनिल भामरे यांनी बदलापूर येथील रेस्क्यू टीमला पाचारण केले. या रेस्क्यू टीमचे मनोहर मेहेर, परेश पानसरे, मनीष फुलपगारे आणि अन्य शहरी यांनी कारंद गावात जाऊन त्या पिसाळलेल्या माकडाला तीन तासांच्या प्रयासानंतर पकडले.

आ.रमेश लटके यांचे निधन

। मुंबई । प्रतिनिधी ।

मुंबईतल्या अंधेरी (पूर्व) चे शिवसेनेचे आ. रमेश लटके (वय ५२) यांचे दुबईत बुधवारी रात्री हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. शिवसेनेचे रमेश लटके हे २०१४ मध्ये पहिल्यांदा विधानसभेवर निवडून आले होते. २०१९ मध्ये त्यांनी मुरजी पटेल यांचा पराभव केला होता. मुख्यमंत्री ठाकरे यांनी निधनाबद्दल शोक प्रकट केला.

दोन वर्षांची प्रतीक्षा संपली
लिपणिवावे पूल सुरू होणार

। आंबेत । वार्ताहर ।

म्हसळा तालुक्यातील आंबेत बागमांडला राज्यमार्गावरील लिपणिवावे पूल हा येत्या काही दिवसात सर्व वाहतुकीसाठी सुरू होणार असून तब्बल दोन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर या पुलावरून सर्व प्रवासी वर्गाला प्रवास करता येणार असल्याची माहिती संबंधित सूत्रांकडून देण्यात आली आहे.

मोडकळीस आलेल्या या पुलाची मागील दोन वर्षांपूर्वी

दुरुस्ती करण्याची प्रक्रिया सुरू झाली. या दोन वर्षात पर्यायी वाहतुकीसाठी बनविण्यात आलेला साकव हा कमी उंचीचा असल्याने ऐन पावसाळ्यात या पुलावरून पाणी वाहत असल्याने •› पान ५ वर

तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

सुधागड तालुक्यातील ठाणाळे येथील एका ३५ वर्षीय तरुणाने बुधवारी आंब्याच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली आहे.

संदीप विठ्ठल फाटे (वय ३५) हा तरुण मंगळवारी (ता.१०) मी शेतात जाऊन फेरी मारून येतो असे घरी सांगून गेला, तो रात्री परत आला नाही. म्हणून त्याचा शोध घेतला असता तो तेथेही मिळून आला नाही. बुधवारी गावातील व्यक्तीस एका शेताजवळील आंब्याच्या झाडाला गळफास घेऊन लटकलेल्या अवस्थेत संदीपचा मृतदेह आढळून आला. या घटनेची पाली पोलीस स्थानकात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षार्थी पोलीस उपनिरीक्षक एल.एन. सरगर हे करीत आहेत.

लालपरी जोमात, काळीपिवळी राणी कोमात

। पेण । प्रतिनिधी ।

राज्यातील हजारो एसटी कामगार सहा महिने संपावर गेल्याने वेळापत्रक कोलमडून पडले होते. लांब पल्ल्याच्या प्रवाशांसह ग्रामीण भागातील नागरिकांचे यात प्रचंड हाल झाले. काही दिवसांपासून ही सेवा पूर्वपदावर येताच जिल्ह्यातील ग्रामीण भागाच्या कानाकोपऱ्यात एसटीची फेऱ्या वाढल्या आहे. यामुळे नागरिकांमध्ये उत्साह निर्माण झाला आहे मात्र गेली सहा महिने लाल परीच्या गैरहजेरीत काळी पिवळी राणी सर्वसामान्यांना ने-आण करत होती. परंतू लाल परी पूर्ववत रस्त्यावर येताच काळी पिवळी राणीच्या रोजच्या गल्ल्यामध्ये फरक पडू लागला आहे.

एसटी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे दीर्घकाळ एसटी सेवा बंद होती. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांचे प्रचंड हाल झाले. आता एसटी जोमाने सुरु झाल्याने ग्रामीण भागातील बंद पडलेली सेवाही पूर्ववत झाली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील प्रवाशांची गैरसोय दूर झाली आहे, याचे समाधान वाटत आहे.
– अनघा बारटक्के,
विभाग नियंत्रक रायगड

रायगड जिल्ह्यातील एकूण आठ आगारांतील दीड हजाराहून अधिक एसटीच्या ग्रामीण भागातील फेऱ्या पूर्ववत झाल्या आहेत. त्यामुळे अनेक नागरिकांसह कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. कामगारवर्ग पुन्हा एकदा नियमित कामावर हजर होऊ लागले आहेत. नागरिकांचे खोळंबलेली कामेही सुरु झाली आहेत. ग्रामीण भागातील प्रवाशांची गैरसोय दूर झाल्याने खिशाच्या कात्रीला लगाम बसला आहे. सुखकर प्रवास, आर्थिक बचत होत आहे. सहा महिन्यांच्या ब्रेकनंतर विद्यार्थी, अपंग, ज्येष्ठ नागरिक, इतर पासधारक नोकरवर्गांना मिळणाऱ्या सवलतीसोबत एसटी जोमाने धावत असल्याने घंटीचा आवाज पुन्हा ऐकू येऊ लागला आहे. त्यामुळे मधल्या काळात कळत •› पान ५ वर

पेण नगरपालिकेचा विक्रम स्टँडवर डोळा

। पेण । वार्ताहर ।

पेण तालुक्याची जीवनवाहीनी समजली जाणारी विक्रम-मिनीडोअर आहे. विक्रम मिनीडोअर चालक मालक संघटना आपल्या वाहनांसाठी १९९७ पासून पेण शहर भूखंड क्र.१०० च्या जागेवर अधिकृतरित्या थांब्याचा (स्टँड) वापर करत आहेत. या अगोदर ही जागा टांगा वाहकांसाठी थांबा म्हणून आरक्षित होती. त्यामुळे १९९७ ला याच जागेचा उपयोग विक्रम मिनीडोअर थांब्यासाठी केला. कारण कालान्वये टांग्याची

जागा रिक्षा, विक्रम मिनीडोअर यांनी घेतल्याने त्या आरक्षित जागेचा उपयोग स्टँडसाठी झाला. मात्र आज जवळपास ५०० तरूण आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा साधन म्हणून विक्रम मिनीडोअर चालवत आहेत. जर हा थांबा हलविल्यास या तरूणांना आपला व्यवसाय करणे कठीण होईल.

पेण शहराच्या मधोमध असलेल्या या जागेवर सत्ताधाऱ्यांनी वक्र नजर ठेवल्याने भविष्यात या जागेवर भाजी मार्केटच्या नावाने मॉल बांधून एखाद्या बड्या बिल्डरच्या घशात घालण्याचे कारस्थान असल्याचे दबक्या आवाजात पेण शहरात बोलले जात होते. मात्र नविन टी.पी.प्लॅन मध्ये सदरील जागा पार्किंगसाठी आरक्षित ठेवण्यात आली. त्यामुळे कळत नकळत तत्कालीन सत्ताधाऱ्यांचे मनसुबे लयास गेले नाहीत. मात्र भूखंड क्र. १०१ मध्ये बांधण्यात आलेल्या कमर्शियल •› पान ५ वर

उन्हामुळे वैरणीसाठी शेतकऱ्यांची भटकंती

पाळीव प्राण्यांवर उपासमारीचे संकट

। पाताळगंगा । वार्ताहर ।

ग्रामीण भागात जनावरांच्या वैरणीचा प्रश्न गंभीर बनला असल्याने शेतकऱ्यांच्या संसाराला हातभार लावणारी पाळीव जनावरे या रणरणत्या उन्हाळ्यात सांभाळणे मोठ्या जोखमीचे झाले आहे. पावसाळा सुरु होण्यास काही दिवसांचा कालावधी लगेच वैरण निर्माण होत नसल्याने जनावरे जगविण्यासाठी पेंढा विकत घ्यावा लागत आहे.

शेकडा आठशे ते हजार रुपये मोजावे लागत असल्याने चारा टंचाईची झळ मुक्या प्राण्यांना बसत असून पेंढा

आणण्यासाठी बैलगाडीचा आधार घ्यावा लागत आहे. असे मत शेतकऱ्यांनी प्रतिनिधींशी बोलताना व्यक्त केले. सध्या माणसाच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडवणे मोठ्या कष्टाचे होत असून, मुक्या जनावरांसाठी चारा उपलब्ध करताना शेतकऱ्याचा जीव मेटाकुटीला आला आहे.

शेतकऱ्याचा जास्तीतजास्त वेळ शेतकामे करण्यापेक्षा जनावरांना चारा उपलब्ध करण्यामध्ये जात आहे. पुर्वी शेतात अथवा मैदानात जनावरे चरायला सोडले तरीही त्यांच्या खाद्याचा प्रश्न मार्गी लागत असे, मात्र आता वणवे लागत असल्यांने चाऱ्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यातच पाणी टंचाईची झळ निर्माण होत असल्याने शेतकरी मोठ्या अडचणीत सापडला आहे. गाय, म्हैस, बैल वाढत्या महागाईमुळे जनावरांच्या खाद्यात ही मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून, शेतकऱ्यांना पशुधन सांभाळणे मोठ्या कष्टाचे होत आहे.

पैशांनी भरलेले पाकीट केले परत

। नागोठणे । वार्ताहर ।

नागोठण्याजवळील पाटणसई गावातील ग्रामस्थ काशिराम टोळू कोतवाल यांना वाकण नाक्यावर सापडलेले पैशांचे पाकीट त्यांनी पाटणसई ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच पांडुरंग गायकर यांच्या मदतीने मालकास परत करून आजच्या जगातदेखील प्रामाणिक माणसे असल्याचे दाखवून दिले आहे. काशिराम कोतवाल यांनी दाखवलेला प्रामाणिकपणामुळे त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

यासंदर्भातउपलब्धमाहितीनुसार वाकणनाका येथील हॉटेल समाधान येथून आपल्या पाटणसई येथील घरी चालत जात असताना काशिराम कोतवाल यांना रस्त्यावर पैशांचे पाकीट सापडले. त्यानंतर त्यांनी पाटणसई ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच पांडुरंग गायकर यांच्याशी संपर्क साधुन त्यांना पाकीट दाखविले. त्या पाकिटात एटीम कार्ड, मोटार लायसन्स व ३ हजार ५०० रुपये रोख रक्कम होती.

नंतर मनोहर माळी यांनी मोटार लायसन्सच्या आधारे कांदळेपाडा तालुका पेण येथील व्यावसायिक राजेंद्र पाटील यांच्याशी संपर्क साधला व त्यांना त्यांचे पैशांचे पाकीट परत केले.

प्रभू विश्वकर्मा प्राणप्रतिष्ठापना दिनाचे आयोजन

। पाली/गोमाशी । वार्ताहर।

श्री प्रभू विश्वकर्मा पांचाळ समाज सेवा मंडळ रायगड आयोजित प्रभू विश्वकर्मा प्राणप्रतिष्ठापणा दिवस रविवार, दि. १५ मे रोजी दमखाडी रोहा येथे करण्याचे ठरविले आहे. या दिवशी प्रभू विश्वकर्मा देवतेचे पूजन अभिषेक, मंदिराचे कोनशीला पूजन, सामाजिक कार्यकर्ते यांचा सत्कार असे विविध कार्यक्रम पार पडणार आहेत. याचा लाभ घेण्यासाठी सर्व विश्वकर्मा पांचाळ, लोहार, सुतार, समाज बांधवांनी उपस्थित राहावे.

तुकाराम घोसाळकर यांचे निधन

। नागोठणे । वार्ताहर ।

नागोठण्यातीलवारकरीसांप्रदायाचे एक प्रमुख आधारस्तंभ तुकाराम पांडुरंग घोसाळकर यांचे बुधवार सकाळी आठ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. कै. तुकाराम घोसाळकर यांच्या पश्चात पत्नी, पुतण्या अमोल घोसाळकर, सुन, नातवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे. कै. तुकाराम घोसाळकर यांचे दशक्रिया विधी शुक्रवार, दि. २० मे रोजी नागोठण्यातील शृंगार तलाव येथे तर उत्तरकार्य (बारावे) रविवार, दि. २२ मे रोजी कुंभार आळी येथे होणार आहे.

अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१३ मे

१) श्री. सुर्यकांत तिबळे
चेंढरे-अलिबाग
१३-०५-१९४४

२) श्री. सखाराम पाटील
चेंढरे-अलिबाग
१३-०५-१९४६

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे म्हातोळी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अनंत नारायण कोळी, वगैरे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नं.	क्षेत्र (हे. आर.)	आकार (रू. पै.)
म्हातोळी	३२१	०-१६-८०	४.८०
		पो. ख. ०-०२-२०	
		०-१९-००	

सदरची संपुर्ण मिळकत ही विद्यमान मालकांचे निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. १३/०५/२०२२

ॲड. विधान अरविंद पाटील
'वत्सला' टिळक रोड,स्टेट बँकेसमोर
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-गणेगाव चिंचवली ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकत कायम स्वरुपी खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

मालकाचे नाव	स.नं./हि.नं. नंबर	क्षेत्र चौ.मी.	आकार रु.पै.
राजेश दामोदर ठाकूर	२/२क	०-२०-७० पो.ख.०-०२-३०	०.५३

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरुपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वांस कळावे.

ॲड. अशोक पालू डुकरे
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट,
ब्लॉक नं. १०१, ममदापूर
रोड, नेरळ, ता. कर्जत,
जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग
केंद्र कार्यालय अलिबाग

प्रिव्हेशन ऑफ मनी लाँड्री ॲक्ट २००२ व रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार बँकांना सर्व खातेदारांचे वेळोवेळी के.वाय.सी. अपडेट करुन घेण्याचे आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या परिपत्रक क्र.आरबीआय/डीबीआर/२०१५-१६/१८ मास्टर डायरेक्शन/डीबीआर/ए.एम.एल./बी.सी.नं. ८१/१४.०१.००१/२०१५-१६ दिनांक २५.०२.२०१६ नुसार बँकेतील सर्व खातेदारांना सूचित करण्यात येत आहे की, बँकेच्या खातेदारांनी के.वाय.सी. (आधारकार्ड, पॅनकार्ड, इलेक्शन कार्ड, पासपोर्ट, नरेगा जॉब कार्ड, ड्रायव्हींग लायसन्स) मूळ डॉक्युमेंटस् व अद्यावत फोटोंसह डॉक्युमेंटची स्वःसाक्षांकित प्रत घेऊन संबंधित शाखेत (खाते असलेल्या शाखेत) उपस्थित राहून के.वाय.सी. अपडेशन करण्यासंदर्भात साक्षांकित प्रत जमा करुन आम्हाला सहकार्य करावे.

सर्व खातेदारांनी वेळेवर के.वाय.सी. कागदपत्रांची अपडेशन केले गेले नाही तर प्रिव्हेशन ऑफ मनी लाँड्री ॲक्ट २००२ व रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे आपल्या खात्यावर व्यवहार करण्यास प्रतिबंध करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी

जाहीर सूचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे वलवली, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खाली नमूद वर्णनाची शेतजमिन मिळकत, श्री.वसंत गणपत पाटील, राहणार वलवली, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या खुद्द मालकीची असून, सदरील शेतजमिन मिळकत, रस्त्याच्या वहिवाटीच्या हक्कासहीत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरित झाला आहे. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून चौदा (१४) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नं.	हि.नं	क्षेत्र(हे.आर.)	आकार(रू.पैसे)
वलवली, ता.अलिबाग	२	६ ब	०-१९-०० ०-०२-२० पो.ख ०-२१-२० एकूण	०२-१२

अलिबाग,
दिनांक : १२/०५/२०२२

सही/-
(ॲड.संजय म.भगत)
हिराबाग सोसायटी
ॲ विंग, टिळक रोड
अलिबाग-रायगड
खरेदीदाराचे वकील

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे सावळे, ता.कर्जत जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली शेतजमिन मिळकत आमचे अशिलांनी तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे तरी सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन

मौजे सावळे, ता.कर्जत, जि.रायगड येथील शेती मिळकत

जमिन मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हि.नं	क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार (रू.पै.)
श्री.अमित रमेश पाटील श्री.कौशिक रमेशचंद्र अनम उर्फ ठक्कर यांची सामाईक मिळकत	१७	११	०.३५.९० पो.ख.०.११.१०	०.६६

यांची ०.४७.०० हे.आर.पॉ. आकार पै.०.६६ इतकी जमीन मिळकत विकण्याची आहे.

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकतीची निर्वेध बोजारहित आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीची खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : १२/०५/२०२२
पत्ताः १०४, हेरंब अपार्टमेंट
नानामास्तर नगर कर्जत - रायगड
मो.नं.९८३३४४५५३३

सही/-
(ॲड.पराग म.सावंत)

ग्रुप ग्रामपंचायत कारावं, ता. पेण, जि.रायगड
जाहिर निविदा

सर्व अधिकृत ठेकेदार यांना कळविण्यात येते की, ग्रामपंचायत फंडातून खालील कामासाठी सीलबंद निविदा मागविण्यात येत आहे. तरी अधिकृत ठेकेदारांनी १३-०५-२०२२ ते दि. १९-०५-२०२२ पर्यंत निविदा पाठवावे. आलेल्या निविदा त्याच दिवशी शक्य झाल्यास सकाळी ११.०० वाजेपर्यंत उघडण्यात येतील. त्यावेळी उपस्थित रहावे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	इसारा रक्कम	निविदा फी	कालावधी	ग्रामपंचायत फंड
१	खारढोंबी हायवे ते लक्ष्मण महादेव ठाकूर अंतर्गत संरक्षण भिंत बांधणे	४,९८,०४२	१%	५००/-	३ महिने	ग्रामपंचायत फंड
२	मितेश ठाकूर ते खारढोंबी रेल्वे फाटक अंतर्गत संरक्षण भिंत बांधणे	४,८८,८३६	१%	५००/-	३ महिने	ग्रामपंचायत फंड
३	खारढोंबी यशवंत रामा ठाकूर ते गोपीनाथ बाळाराम ठाकूर घराजवळ संरक्षण भिंत बांधणे	२,४९,८५६	१%	५००/-	३ महिने	ग्रामपंचायत फंड
४	काळबादेवी मंदिराजवळ पंपहाऊस बांधणे	१,९३,७७२	१%	५००/-	३ महिने	ग्रामपंचायत फंड
५	मौजे निकेश म्हात्रे ते मोठा नाला पर्यंत गटार पाईप लाईन टाकणे	१,५२,९८८	१%	५००/-	३ महिने	ग्रामपंचायत फंड
६	लिलाधर म्हात्रे घर ते मोठा नाला पर्यंत गटार पाईप लाईन टाकणे	१,५५,०५८	१%	५००/-	३ महिने	ग्रामपंचायत फंड
७	समीर म्हात्रे जलाल माळीपर्यंत रस्ता पेव्हर ब्लॉक करणे.	५१,७६१	१%	५००/-	३ महिने	ग्रामपंचायत फंड
८	पांडुरंग पाटील ते नरेश पाटील रस्ता पेव्हर ब्लॉक करणे.	१,२२,८२६	१%	५००/-	३ महिने	ग्रामपंचायत फंड
९	हरिश्चंद्र म्हात्रे ते कृष्णा म्हात्रे अंतर्गत रस्ता पेव्हर ब्लॉक करणे.	२,८१,९५४	१%	५००/-	३ महिने	ग्रामपंचायत फंड
१०	रेल्वे फाटक कारावी ते विहिर (बागात) अंतर्गत पाईप लाईन टाकणे	२,९८,६५४	१%	५००/-	३ महिने	ग्रामपंचायत फंड
११	इस्टबिन वेशी करावी	६३,७९०	१%	५००/-	३ महिने	ग्रामपंचायत फंड
१२	संदीप नामदेव मोकल ते राकेश यशवंत मोकल रस्ता कॉक्रीटीकरण	१,४२,७४०	१%	५००/-	३ महिने	ग्रामपंचायत फंड
१३	प्रकाश हरिश्चंद्र मोकल ते पांडुरंग महादेव मोकल रस्ता कॉक्रीटीकरण	२,०८,७५३	१%	५००/-	३ महिने	ग्रामपंचायत फंड
१४	इस्टबिन बागात	६३,७९०	१%	५००/-	३ महिने	ग्रामपंचायत फंड
१५	मरुदेवी मंदिर ते अनिल महादेव मोकल पेव्हर ब्लॉक	४,९९,८५१	१%	५००/-	३ महिने	ग्रामपंचायत फंड
१६	इस्टबिन (स्मशानभूमी) कारावी	६३,७९०	१%	५००/-	३ महिने	ग्रामपंचायत फंड
१७	सार्वजनिक शौचालय दुरुस्ती (व्यायाम शाळेजवळ)	६२,३९६	१%	५००/-	३ महिने	ग्रामपंचायत फंड
१८	मौजे कारावं दामोदर वेट्या पाटील ते पांडुरंग हरी पाटील संरक्षण भिंत बांधणे.	९,९८,९०६	१%	५००/-	३ महिने	ग्रामपंचायत फंड
१९	मौजे कारावं कृष्णा पांडुरंग म्हात्रे ते गजानन सखाराम म्हात्रे संरक्षण भिंत व माती मुरुम रस्ता करणे.	६,०९,०८८	१%	५००/-	३ महिने	ग्रामपंचायत फंड
२०	नारायण गोपीनाथ पाटील ते पांडुरंग परशुराम पाटील आर.सी.सी. गटार	२,३३,११८	१%	५००/-	३ महिने	ग्रामपंचायत फंड
२१	अशोक शंकर पाटील घर ते सार्वजनिक शौचालय अंतर्गत रस्ता	४,९९,७८०	१%	५००/-	३ महिने	ग्रामपंचायत फंड
२२	तुकाराम बारक्या पाटील ते दत्ताराम पांडुरंग पाटील आर.सी.सी.गटार	४,९९,५५९	१%	५००/-	३ महिने	ग्रामपंचायत फंड
२३	खारचिर्बी अंतर्गत गटार आणि संरक्षण भिंत	३,२५,४४४	१%	५००/-	३ महिने	ग्रामपंचायत फंड
२४	खारचिर्बी मधील सार्वजनिक शौचालय दुरुस्ती	३,५२,३८८	१%	५००/-	३ महिने	ग्रामपंचायत फंड
२५	चांगदेव माया पाटील ते रमेश आत्माराम पाटील अंतर्गत आर.सी.सी. गटार	४,९७,४५६	१%	५००/-	३ महिने	ग्रामपंचायत फंड
२६	देवकी तलाव ते दत्ताराम पाटील आर.सी.सी. गटार	४,७१,१३०	१%	५००/-	३ महिने	ग्रामपंचायत फंड
२७	माचेला सार्वजनिक शौचालय बांधणे	४,५८,८७३	१%	५००/-	३ महिने	ग्रामपंचायत फंड
२८	पाणी पुरवठा साहित्य खरेदी	५,००,०००	१%	५००/-	१ वर्ष	ग्रामपंचायत फंड
२९	दिवाबत्ती साहित्य खरेदी	५,००,०००	१%	५००/-	१ वर्ष	ग्रामपंचायत फंड

अटी व शर्ती :-

१) निविदा संबंधित सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत मिळेल.
२) निविदा कार्यालयीन वेळेत मा. सरपंच यांच्या नावाने ग्रामपंचायत कार्यालयात सादर कराव्यात.
३) अपूर्ण व उशिरा पोहोचलेल्या निविदेचा विचार ग्रामपंचायत करणार नाही.
४) निविदेसोबत इसारा रक्कम डिमांड ड्राफ्ट किंवा रोखीची पावती जोडलेली असावी.
५) कोणतेही कारण न देता १ किंवा सर्वच निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायत सरपंच यांनी राखून ठेवलेला आहे.
६) नोंदणीकृत ठेकेदाराने विहित मुदतीत काम पूर्ण न केलेस सदर कामाचा ठेका रद्द करण्यात येईल.
७) निविदा मंजूर झाल्यानंतर ५०० रु. स्टॅम्प पेपरवर करारनामा स्वखर्चाने करुन द्यावा.
८) निविदा नामंजूर केलेल्या ठेकेदाराने कोणत्याही प्रकारचे पत्र व्यवहार केला जाणार नाही.
९) शासकीय नियमानुसार शासकीय कपात करुन अंतिम बिल दिले जाईल.

सही/-
ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत कारावं
ता. पेण, जि. रायगड

सही/-
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत कारावं
ता. पेण, जि. रायगड

SRM E –TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

Sr. No.	Tender / Notice No.	Particulars of Tender	Estimated Cost of Tender
1	**Tender No:- EE/EHV (O &M) /DIVN/ MHD/Tech/Tender-21/ 2022-23 Dtd.13.05.2022 RFX No. 7000023265**	**Sub:-** Invitation of SRM E-tender for the work of construction of RCC retaining wall at Loc.No.9 & 10 for 220 kV Mahad Kalambani and Mahad Kandalgaon D/C line under KTL S/Dn. Mahad under EHV (O&M)Dn Mahad for the year 2022-23	**Rs. up to 3378589/- (Including GST+ 1% Labour CESS)**

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 5000/-plus GST+1% Labour CESS.
Bid submission is from 13.05.2022 @ 00:00 hrs to 19.05.2022 @23:59 Hrs for above tender
for further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
Contact Person :- The Addl. Executive Engineer, (O) : Phone No. 7373101089
Note : All eligible Suppliers / Contractors are mandated
to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

Sd/-
(Mr. Pankaj H. Talele)
Executive Engineer, EHV (O&M) Dn, Mahad

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे ढवर, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खाली वर्णन केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री.गिरीष चिंतामण म्हात्रे व सौ. गौरी गिरीष म्हात्रे यांचेकडून विकत घेण्याचा व्यवहार निश्चित केला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नंबर	क्षेत्र हे.आर.चौ.मी	आकार रू.पै.
ढवर ता.अलिबाग जि.रायगड	२१३	०-८४-२० पो.ख.०-०७-०० ०-९१-२०	६-८०

पैकी श्री.गिरीष चिंतामण म्हात्रे व सौ.गौरी गिरीष म्हात्रे यांचे नावे सातबारा अभिलेखात दर्शविण्यात आलेले ०-१८-८० हे.आर.क्षेत्र, आकार रू.१-५२ पै.

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट, वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हकरती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : १२/०५/२०२२

ॲड.निलेश अशोक म्हात्रे
गुरूकृपा महर्षी कर्वे रोड,
अलिबाग अर्बन बँके शेजारी, अलिबाग,
ता.अलिबाग जि.रायगड
मोबा.नं. ९८५०४८६९४२

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां.विभाग, पनवेल
पिनकोड -४१०२०६
Email :- panvel.ee@mahapwd.com
दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५७७८ फॅक्स- ०२२-२७४६७४४०
ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र.०७ (ई-निविदा) सन २०२२-२३

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र.०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकामखात्याकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदारांकडून कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना-www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.
टिप-या निविदेमध्ये एकूण १४ कामे समाविष्ठ असून ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक १७.०५.२०२२ सकाळी १०.०० ते दिनांक ३१.०५.२०२२ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/२०५३
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.विभाग, पनवेल, जि.रायगड
दिनांक : ११/०५/२०२२

सही/-
कार्यकारी अभियंता
सा.बां.विभाग, पनवेल

विमाका/कोवि/२०२२-२०२३/३९

कर्जत नगरपरिषद, कर्जत
पाणी पुरवठा विभाग
जाहीर निविदा सूचना

कर्जत नगरपरिषद हे खालील प्रमाणे कामासाठी इच्छूक ठेकेदाराकडून बी-१ पद्धतीने निविदा मागवित आहे. ज्या ठेकेदारांना निविदा भरावयाच्या असतील त्यांनी कामाच्या समोर नमूद केलेली निविदा फॉर्मची किंमत नगरपरिषदेकडे भरणा करुन निविदा फॉर्म दिनांक १२-०५-२०२२ ते १८-०५-२०२२ दु. ५-०० वाजेपर्यंत सुट्टीचे दिवस सोडून पुरविल्या जातील.

ठेकेदारांनी आपले कडील सिलबंद निविदा १८-०५-२०२२ रोजी सायं. ४-०० वाजेपर्यंत मुख्याधिकारी कर्जत नगरपरिषद यांचे नावे सादर कराव्यात. प्राप्त निविदा दिनांक १८-०५-२०२२ रोजी सायंकाळी ५-३० वा. उघडणेत येतील अथवा कारणास्तव नंतर उघडणेंत येतील. कोणतेही कारण न देता अगर सर्व निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	बयाणा रक्कम	निविदा फॉर्म फी
१.	गुडंगे स्मशानभुमी नळ कनेक्शन बाबत	१०००/-	२००/-

१. कामाकरिता ठेकेदार यांनी स्वत:चे लेटरहेडवर निविदा फॉर्म मागणी करणेचे आहे.
२. ज्या ठेकेदाराची निविदा नगरपरिषद मंजूर करील त्या ठेकेदाराला योग्य त्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.
३. कामा संदर्भात माहिती व फॉर्म कार्यालयीन वेळेत पाणी पुरवठा विभागात मिळेल त्या करीता कसलीही तक्रार चालणार नाही.
४. सविस्तर निविदा सूचना व अटी व शर्ती नगरपरिषद कार्यालयात पाहावयास मिळतील.
५. लिफाफा नं. १ फोडून त्यामधील कागदपत्रांची तपासणी करुन आवश्यक ते कागदपत्रे असले नंतरच लिफाफा नं. २ दरपत्रक फोडणेत येईल अन्यथा निविदेचा विचार केला जाणार नाही.

(श्री.सुरेखा भगणे)
मुख्याधिकारी
कर्जत नगरपरिषद, कर्जत

(सौ. सुवर्णा केतन जोशी)
अध्यक्ष
कर्जत नगरपरिषद, कर्जत

सुधागडमध्ये 'हळव्या'चा प्रादुर्भाव

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

सुधागड तालुक्यात बोटोलिझम (हळव्या) या रोगाचा प्रादुर्भाव वाढला आहे. मागील २ महिन्यात सुधागड तालुक्यातील नांदगाव पंचक्रोशीतील दिघेवाडी व अन्य गावातील ३० ते ३५ जनावरे या आजाराने दगावल्याची शक्यता आहे. दुभती व कामाची जनावरे मेल्याने शेतकरी व पशु पालकांचे लाखो रूपयांचे नुकसान झाले आहे.

उन्हाळ्यात जनावरांना चरण्यासाठी चारा नसतो म्हणून जनावरे मेलेल्या गुरांची हाडे चघळल्याने हा रोग होतो. या रोगाचे प्रमाण मोकाट गुरांमध्ये जास्त दिसते. हा रोग संसर्गजन्य असून लागण झालेले एक गुरे दुसऱ्या गावात जाऊन दुसऱ्या गुरांना देखील संक्रमित करू शकतो. या रोगामुळे अनेकांच्या दुभत्या गायी, म्हशी, बैल आदी मुकी जनावरे मृत्युमुखी पडले आहेत. या रोगावर अद्याप शासनाने लस उपलब्ध केली नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. लवकरच या रोगावर शासनाने लस उपलब्ध करावी, अशी मागणी पशुपालकांमधुन होत आहे.

ग्रामपंचायतींचे दुर्लक्ष

दर सहा महिन्यांनी गुरांना लसीकरण करण्यात यावे याकरिता प्रत्येक ग्रामपंचायतीला पत्र पाठवण्यात येत असते. त्या पत्राची दखल घेऊन ग्रामपंचायतीने गावातील गुरांना लसीकरण करावे याकरिता जनजागृती करावयाची असते. मात्र याकडे ग्रामपंचायती देखील दुर्लक्ष करतांना दिसत आहेत. परिणामी गावातील गुरांना रोग प्रतिबंधक लस टोचली जात नाही आणि याचमुळे गुरे दगावण्याचे प्रमाण वाढले आहे.

बोटोलिझम रोगाची लक्षणे

जनावर मागील बाजूने कमकुवत होणे, पाय आखडुन खाली बसणे, मान टाकणे, शेपुट न हालवणे व बसल्यानंतर न उठणे ही लक्षणे या रोगाची आहेत.

कर्मचाऱ्यांची कमतरता

सुधागड तालुक्याच्या लोकसंख्येनुसार पशुसंवर्धन विभागाकडे कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. यामुळे प्रत्येक ठिकाणी हे कर्मचारी पोहचण्यास असमर्थ ठरत आहेत. तरीही तालुक्यात असणारे दोन ते तीन अधिकारी व काही कर्मचारी हे गावोगावी जाऊन गुरांना लसीकरण करत असतात.

शेतकरी व पशु पालकांचे नुकसान

दिघेवाडी गावातील मागील दोन महिन्यात ३० पेक्षा जास्त गुरे या रोगाने दगावली आहेत. यामधे माझ्या दोन दुभत्या गायी व बैलाचा मृत्यू झाला आहे. शासनाने यावर ठोस उपाययोजना करावी व नुकसान भरपाई द्यावी.

–श्रीपत उतेकर, पशुपालक, दिघेवाडी

बोटोलिझम रोगाने या गुरांचा मृत्यू झाला असू शकतो. पशुपालकांनी गुरे मृत झाल्या संदर्भात कल्पना दिली नव्हती. मात्र तत्काळ बाधित गुरांवर उपचार करून लसीकरण करण्यात येईल. या रोगावर अद्याप लस उपलब्ध नसली तरी या रोगावर वेळेवर उपचार केले तर हा रोग बरा होतो. त्यामुळे या रोगाची लक्षणे आढळल्यास पशुधन विभागाशी पशूपालकांनी संपर्क साधावा. पशुधन विभाग तात्काळ यावर उपाययोजना करेल. तसेच पशुधन मोकाट सोडू नये

–डॉ. प्रशांत कोकरे, पशुधन विकास अधिकारी, सुधागड

महत्त्वाचे

पनवेलमध्ये गौरव

। पनवेल । वार्ताहर ।

टाकाऊ पासून टिकाऊ स्पर्धा, स्वच्छ सर्वेक्षण २०२२ स्पर्धा बक्षीस समारंभ , भारतरत्न डॉ. आंबेडकर जयंती उत्सवावेळी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा तसेच स्वच्छता दुतांचा गौरव सोहळा १६ मे सकाळी १०:३० वाजता आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके, नाट्यगृहात आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल यांनी दिली आहे.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती १४ मे रोजी निमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धें तील विजेत्या स्पर्धकांना देखील बुध्दपोर्णिमेनिमित्त होणाऱ्या या कार्यक्रमांमध्ये बक्षीस दिले जाणार आहे.

खुटल वाडीत दाखले वाटप

उरण । वार्ताहर ।

उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके, तहसीलदार विजय तळेकर, शशिकला अहिरराव आदिवासी प्रकल्प अधिकारी पेण यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उरण सामाजिक संस्थेच्या माध्यमातून १० मे रोजी विविध प्रकारचे दाखले वाटप करण्यात आले शासनाच्या विविध योजनांचा थेट लाभ देण्यात आला.सलग तीन दिवस मुक्काम ठोकून जातीच्या दाखले काढण्यासाठी फॉर्म्स भरून घेतले. त्याची ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण केली, सर्व दाखले लॅमिनेशन करून वाटप केले. एवढ्या जलद गतीने कोणत्याही तालुक्यात काम झाले नसेल एवढ्या जलद गतीने काम पूर्ण केले.

कर्जतमध्ये विविध कामांचे उद्घाटन

। कर्जत । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यातील विविध कार्यक्रमासाठी १५ मे रोजी माजी आ. पंडित पाटील व जिल्हा परिषदेच्या मा. अध्यक्षा अँड. निलिमा पाटील उपस्थित राहणार आहेत. सदर प्रसंगी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने करण्यात आलेल्या भडवल येथील शिवमंदिर सभामंडप, स्वागत कमान, अंतर्गत रस्ता तसेच ममदापुर येथील नळ पाणी पुरवठा योजनेचा लोकार्पण सोहळा हे कार्यक्रम होणार आहेत. तसेच संध्याकाळी ६.०० वाजता मौजे उकरूळ येथे विविध सहकारी सोसायटीमध्ये निवडून आलेल्या सभासदांचा तसेच कोरोना काळात कार्य केलेल्या कोव्हिड योद्धे ह्यांचा सत्कार माऊली कृपा शेतकरी मंडळ उकरूळ ह्यांच्या माध्यामातून मा. पंडित पाटील व अँड. निलिमा पाटील ह्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. तरी सदरील कार्यक्रम करिता कर्जत तालुक्यातील शेतकरी कामगार पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

मोर्बा जि.प गटात विकासकामांचा धडाका

जि.प. सदस्या आरती मोरे यांचा पाठपुरावा आ. जयंत पाटील यांची प्रमुख उपस्थिती

। माणगाव । वार्ताहर ।

माणगाव तालुक्यातील मोर्बा जिल्हा परिषद गटात शेकाप पक्षाच्या रायगड जिल्हा परिषद सदस्या आरती मोरे यांनी आपला विकासकामांचा धडाका सुरूच ठेवला आहे. गेल्या पाच वर्षात त्यांनी मोर्बा जिल्हा परिषद गटात विविध गावांमध्ये पाच कोटी रुपयांपेक्षा अधिकतम विकासकामे केली असून यांपैकी बरीचशी कामे मार्गी लागली असून काही कामे प्रगतीपथावर आहेत. या विकासकामांपैकी मोर्बा जिल्हा परिषद गटातील काही गावातील विकासकामांचा भूमिपूजन व उद्घाटन सोहळा कार्यक्रम शनिवार दि.१४ मे २०२२ रोजी आयोजित केला आहे.

सदर कार्यक्रमासाठी आ. जयंत पाटील, माजी आ. पंडित पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस अँड. आस्वाद पाटील, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सुप्रिया पाटील, महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, रायगड जिल्हा परिषद सदस्या चित्रा पाटील, आर. डी.सी.सी.बँकेचे संचालक अस्लम राऊत, रायगड जिल्हा परिषद सदस्या आरती मोरे आदी प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत. तसेच या कार्यक्रमास राजिपचे माजी समाजकल्याण सभापती अशोक गायकवाड, कृउबा समिती सभापती माणगाव संजय पंदेरे, मोर्बा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच विलास गोठल, उपसरपंच हसनमिया बंदरकर, महेश सुर्वे, विजय आंब्रे, नरेश दळवी, निजाम फोपळूणकर, विलास मोरे, राजेश कासारे, दिनेश गुगुळे, ज्येष्ठ नेते भागोजीबुवा डवले, गोविंद पवार, नथुराम आडीत,नितीन वाघमारे, वैभव डवले, विरेन मेथा, अमोल मोहिते, संजय गायकवाड, दिलीप उतेकर यांच्यासह मुंबईकर मंडळ आदी उपस्थित राहणार आहेत.

तरी या कार्यक्रमास मोर्बा जिल्हा परिषद गटातील पक्षाचे प्रमुख सर्व कार्यकर्ते तसेच तालुक्यातील कार्यकर्त्यांनी, विभागातील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन तालुका चिटणीस रमेश मोरे यांनी करून या कार्यक्रमाची जोरदार तयारी माणगाव तालुका शेतकरी कामगार पक्षातर्फे करण्यात आली असल्याचेही त्यांनी सांगितले.

यादिवशी सकाळी १०:३० वाजता मौजे न्हावे येथे बगाडाचे लोकार्पण, सकाळी ११:३० वाजता मौजे कुमशेत येथे विविध विकासकामांचे भूमीपूजन व उदघाटन, दुपारी १२ वाजता मौजे पळसप येथे डांबरीकरण रस्ता व सभागृहाचे उदघाटन, दुपारी १२:३० वाजता मौजे रानवडे येथे नळ योजना, सभामंडप लादी, शाळा दुरुस्ती, स्मशानभूमीकडे जाणारा अंतर्गत रस्ता, बोरवेल इ.उदघाटन व भूमीपूजन, दुपारी १ वाजता गोवेले मानसई वाडी येथील रस्त्याचे डांबरीकरण व शाळा दुरुस्ती उदघाटन, दुपारी १:३० वाजता चांदोरे कुणबी आळी सभागृह भूमीपूजन, दुपारी २ वाजता मौजे कातळाची नळेफोडी येथे गणेश मंदिर, अंगणवाडी, साकव इ.कामाचे भूमीपूजन, दुपारी ३ वाजता निवाची नळेफोडी येथे डांबरीकरण रस्ता व सभामंडप तसेच शाळा दुरुस्ती उदघाटन, सायंकाळी ४ वाजता मौजे नाईटने येथे नळ पाणी पुरवठा योजनेचे भूमीपूजन आदी कामांचा शुभारंभ उपस्थित मान्यवरांच्या हस्ते होणार असल्याचे तालुका चिटणीस रमेश मोरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे.

■ मुरुड कोळीबांधवांना गेली २ दिवस किनाऱ्यावर कोळंबी मिळत असल्याने किनाऱ्यावर ओढलेल्या छोट्या बोटी पुन्हा अखेरची मासेमारी करुन किनाऱ्यावर मासळी घेऊन आलेले दिसत आहेत. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे रक्तदान शिबीर

। उरण । वार्ताहर ।

पद्मश्री पुरस्काराने सन्मानित असणारे आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान मार्फत जेएनपीटी वसाहत मधील मल्टिपर्पज सभागृहामध्ये दि. १२ मे रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरामध्ये ९०० हुन अधिक रक्तदात्यानी रक्तदान केले. या शिबिरामध्ये तीन रक्तपेढ्यांनी आपली टीम तैनात केली. जे.जे महानगर ब्लड बँक, जिल्हा रुग्णालयात अलिबाग रक्त केंद्र, डीवाय पाटील रक्तपेढी यांनी रक्तसंकलन केले. आज सर्वत्र रक्ताची गरज भासत आहे, अनेकांनी रक्त न मिळाल्याने आपले प्राण गमावले आहे. त्यामुळे भासत असलेली रक्ताची गरज दूर करण्यासाठी पद्मश्री आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या वाढदिवसानिमित्ताने डॉ नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्यामार्फत रक्तदान शिबीर संपन्न झाले.

या वेळी जयवंत ढवळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर, विकास भोईर, दीपक ठाकूर, मनीषा जाधव, डॉ. राज हिंगोराणी, प्रसाद कुलकर्णी, डॉ. श्रेयस पाटील, श्री सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उरण शहरात नाले सफाईला सुरुवात

। उरण । वार्ताहर ।

उरण नगरपालिकेने लवकरच नाले सफाईला सुरवात केली आहे. शहरातील दादर, कुंभारवाडा, कामठा, भिवंडीवाला, या मुख्य नाल्यांची सफाई ही ठेकेदारामार्फत केली जात आहे. दरवर्षी उरण उरण नगरपालिका मे अखेर मान्सूनपूर्व नाले सफाई करण्याची कामे करत आहे. मात्र मागील वर्षी मे महिन्यात चक्रीवादळाने धुमाकूळ घातल्याने नाले सफाईला विलंब लागला होता. मात्र या वर्षी चक्रीवादळाचे संकेत हवामान खात्याकडून देण्यात आले आहे. या वर्षी ही ती परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी उरण नगरपालिकेचे मुख्याधिकारी संतोष माळी यांनी लवकरच नालेसफाई करण्याचा निर्णय घेऊन कामाला सुरुवात करण्यात आली आहे.

द्रोणागिरी डोंगराकडून येणारा पाणी मुख्य नाल्याकडून तो थेट कोळीवाडा मार्गे समुद्रात जातो आहे.त्यामुळे त्या नाल्याची सफाई ही प्रथम केली जात आहे. शहरातील गटारामध्ये कचरा प्लास्टिक जाऊन पावसाळ्यात मुसळधार पाऊस पडल्याने गटारे तुंबली जातात आणि निचरा होत नाही. त्यामुळे पूरस्थिती निर्माण होत असते. नागरिकांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होऊ नये. या पूरस्थितीपासून उरण शहरवासियांची सुटका होण्यासाठी नगरपालिका तत्पर होऊन मान्सून पूर्व नालेसफाईला सुरवात करण्यात आली आहे.

धोकादायक झाडे तोडण्याची मागणी

। खांब-रोहा । वार्ताहर ।

रोहे व नागोठणे या दोन शहरांना जोडणाऱ्या भिसे खिंडीतील रस्त्या लगत असणाऱ्या डोंगर उतारावरील झाडांच्या मुळांशी जेमतेम मातीचा आधार राहिल्याने पावसाळ्यात कधीही ही झाडे कोसळून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पावसाळ्यात येथून प्रवास करताना अपघाताचा धोका वाढला आहे.

रोहे व नागोठणे या दोन शहरांना जोडण्याबरोबरच नागोठणे कडून अलिबाग व मुरूड तर रोह्याकडून पाली, खोपोली व पेण, पनवेलकडे जाण्यासाठी मध्यम व सोईचा मार्ग म्हणून भिसे खिंडीतील मार्ग प्रचलित आहे. त्यामुळे या मार्गावर रात्रंदिवस मोठी वर्दळ आढळून येते.

अगोदरच हा मार्ग म्हणजे अरूंद रस्ता, वेडीवाकडी वळणे यामुळे प्रवास करताना धोकादायकच वाटत आहे. त्यातच सद्य स्थितीत या मार्गावरील रस्त्यालगत असणाऱ्या डोंगरावरील झाडांच्या मुळांशी मातीच नसल्याने कोसळण्याच्या स्थितीत आहे.त्यामुळे कधीही मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पाच तालुक्यांच्या मध्यवर्ती व प्रवासाच्या दृष्टीने अत्यंत सोईच्या असणाऱ्या या खिंडीतून प्रवास करणे सर्वांनाच परवडत असल्याने इथे कायमच मोठी रहदारी आढळून येते .त्यामुळे रहदारीचा विचार करता प्रवासी वर्ग व वाहनचालक यांची सुरक्षितता धोक्यात येऊ नये यासाठी संबंधित विभागाने त्वरित पावसाळा ऋतूस प्रारंभ होण्यापूर्वी धोकादायक ठरणारी झाडे तोडण्याची मोहिम हाती घेणे गरजेचे असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे संभाव्य धोका टाळता येऊ शकेल.

पाच ते सहा कि.मि.अंतर असणाऱ्या या खिंडिचा बहुतेक भाग घनदाट जंगलातूनच जात असल्याने एका बाजूला पूर्णपणे खोलवर दरी आहे. त्यामुळे वाहनचालकांनाही वाहने चालविताना पुरेशी खबरदारी घेऊनच वाहने चालवावी लागत आहे.

माऱ्सूनपूर्व कामांसंदर्भात बैठकीचे आयोजन

पनवेल । वार्ताहर ।

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रांतील मान्सुनपूर्व कामांचा आढावा आयुक्त गणेश देशमुख यांनी मुख्यालयात घेतला. या बैठकिस सार्वजनिक बांधकाम विभाग, सिडको, पोलिस विभाग, आयआरबी या आस्थांपनांतीलअधिकारी उपस्थित होते. यावेळी पालिका क्षेत्रात पावसाळ्यात पाणी साठणाऱ्या विविध भागांची माहिती घेऊन ते साठू नये यासाठी करण्यात येणाऱ्या उपाय योजनांवर चर्चा करण्यात आली. यावेळी सचिन पवार, मिलींद कदम, आर.एन दिवेकर, सं.बा. माळी, दिलीप शिंदे, गणेश खांडेकर, विलास बनकर,धनंजय चिखलेकर , मदनलाल गांधी उपस्थित होते.

अखेर ई- रिक्षाचा लढा यशस्वी

नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण

। माथेरान । वार्ताहर ।

मागील दहा वर्षांपासून ई रिक्षासाठी अविरतपणे लढा देत दि. १२ मे रोजी सुप्रीम कोर्टाच्या निकालानुसार माथेरानमध्ये ई रिक्षा सुरू करण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे. त्यासाठी ई रिक्षा श्रमिक संघटनेचे सचिव, सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदेंनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.

जग एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करीत असताना देखील माथेरानसारख्या या सुंदर स्थळावर ब्रिटिश काळापासून आजही इथे अमानुषपणे हातरिक्षाचा व्यवसाय सुरु आहे. या श्रमिकांना या अमानवीय प्रथेतून कायमस्वरूपी मुक्ती मिळावी त्याचप्रमाणे चार ते पाच किलोमीटर अंतरावर असणाऱ्या शाळांमध्ये लहान लहान विद्यार्थ्यांना शाळेसाठी पायपीट करावी लागत आहे. इथे दळणवळणाची सुविधा नसल्याने इथली स्थानिक मंडळी महागाईच्या झळा सोसत खूपच हलाखीचे जीवन जगत आहेत हे कुठेतरी थांबले पाहिजे यासाठी सुनील शिंदेंनी मागील दहा वर्षांपासून शासन दरबारी पाठपुरावा सुरू केला होता. ई-रिक्षा सुरू करणे हे सर्वात मोठे आव्हान असताना देखील त्यांनी केवळ इथली भौगोलिक परिस्थिती बदलली पाहिजे. वाहतुकीची सोय नसल्याने इच्छा असून सुद्धा वयोवृद्ध पर्यटक येऊ शकत नाहीत याची खंत वाटत असल्यामुळे सुनील शिंदेंनी दहा वर्षे आपला लढा अविरतपणे सुरू ठेवला त्याला यश मिळाले असून लवकरच हे सुंदर स्थळ ई रिक्षाच्या माध्यमातून जगाच्या बरोबरीने धावणार आहे.

हातरिक्षा चालकांच्या दहा वर्षाच्या संघर्षाला अभूतपूर्व यश आले आहे. माथेरानकरांसाठी हा आजचा सोन्याचा दिवस आहे.

– सुनील शिंदे
सामाजिक कार्यकर्ते माथेरान

खऱ्या अर्थाने अभूतपूर्व निर्णय दळण वळणातील व पर्यटन वाढीसाठी महत्त्वपूर्ण निर्णय आहे. माणसाकडे चिकाटी असली की काय होते. वेळ, पैसा, प्रसंगी विरोध आपल्या घरातील मधल्या काळातील आजारपण या सगळ्या गोष्टीवर आपण मात केली. माथेरानकर आपले योगदान कधीच विसरणार नाही याची इतिहासात आपली नोंद राहील.

– शिवाजी शिंदे, माजी विरोधी पक्षनेते काँग्रेस

खरोखरच ही एक ऐतिहासिक घटना म्हणावी लागेल. कारण इथे स्थानिकांना आजवर अनेक संकटांना तोंड द्यावे लागत होते. आम्ही पदभार स्वीकारल्यानंतर ई रिक्षाचा प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याने विविध कार्यालयात जावे लागत होते. सुनील शिंदेंनी जी काही मेहनत घेतली आहे ती खरोखरच वाखाणण्याजोगी आहे.

–सुरेखा भणगे, मुख्याधिकारी तथा प्रशासक माथेरान नगरपरिषद

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदीनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण परिस्थितीला तोंड देऊन पोटाची खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका नातेवाईकाला एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे.

या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

स्व. श्री. नरेंद्र मिलापचंदजी पुनमिया स्मरणार्थ, पेण

संपादकीय

नामदेवची आत्महत्या

बीड जिल्ह्यातील हिंगणगावच्या नामदेव जाधव या तीस वर्षीय शेतकऱ्याने बुधवारी उसाचा फड पेटवून देऊन आत्महत्या केली. शेतातील उभा ऊस वाळून चालल्याने आणि त्याच्या गाळपाची कोणतीही व्यवस्था न दिसल्याने नामदेवने हे टोकाचे पाऊल उचलले. राज्यातील अतिरिक्त उसाचा प्रश्न किती गंभीर झाला आहे हे यावरून स्पष्ट व्हावे. गेल्या काही वर्षांपासून काही भागात प्रचंड ऊस होऊन त्यांचे वेळेत गाळप होण्यात अडचणी येणे हे नित्याचे बनले आहे. यंदा मात्र याचा कहर झाला आहे. मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्राचा काही भाग यामध्ये उसाचे गाळप कारखान्यांना आटपेना अशी अवस्था आली आहे. आता मे महिना जवळपास अर्धा संपत आला व पावसाळा जवळ आला. पुढच्या खरिपाची तयारी सुरू झाली. तरीही अनेक शेतांमधील उस जागीच उभा आहे. अनेक ठिकाणी तो वाळून चालला आहे. यामध्ये शेतकऱ्यांचे मोठे नुकसान आहे. साखर उद्योगाला सरकारचा असलेला पाठिंबा, सर्वपक्षीय राजकारण्यांनी एकमेकांचे कित्ते गिरवत जिकडेतिकडे उभारलेले साखर कारखाने आणि, परिणामी, ऊस हे नक्की उत्पन्न देणारे पीक आहे अशी शेतकऱ्यांची झालेली भावना यामुळे ही सर्व स्थिती ओढवली आहे. सोलापूरसारख्या अर्धदुष्काळी जिल्ह्यात एकेकाळी गणपतराव देशमुखांसारख्यांनी डाळिंब हे कमी पाण्यावर येणारे फळ-पीक यशस्वी केले म्हणून गौरव केला जात असे. आता त्याच सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक म्हणजे ३३ साखर कारखाने असून अक्कलकोट, मंगळवेढा अशा दुष्काळी तालुक्यांमध्येही साखर कारखाने उभे राहिले आहेत. हीच स्थिती मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये आहे. किंबहुना, अतिरिक्त उसाची सर्वात गंभीर समस्या मराठवाडा या एरवी दुष्काळी गणल्या जाणाऱ्या प्रांतातच आहे. याउलट कोल्हापूर आणि सांगलीतील उसाचा बहुतांश हंगाम ३१ मार्चलाच संपला आहे. सुमारे नव्वद हजार हेक्टर जादा क्षेत्रातील लागवड आणि चांगले पाऊसमान यामुळे हंगामाच्या सुरुवातीपासूनच यंदा अतिरिक्त उसाचा प्रश्न तीव्र होईल असे दिसत होते. सरकारने याबाबत काही नियोजन करण्याचा प्रयत्नही केला. पण तो पुरे पडलेला नाही. अन्यथा नामदेवला जीव द्यावा लागला नसता. या निमित्ताने एकूणच शेती क्षेत्राबाबत सरकार, शेतीतील जाणकार, शेतकरी इत्यादींनी मिळून एक व्यापक विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. आधुनिक शेतीतंत्र, उत्तम बी-बियाणे, नशिबाने मिळणारे चांगले पाऊसमान यामुळे एखाद्या पिकाचे अतोनात उत्पादन होणे हे आता नित्याचे होऊन बसले आहे. तेलंगणामध्ये पाणीपुरवठा सुधारल्याने तांदळाचे इतके उत्पादन होऊ लागले आहे की, त्याची खरेदी करणे सरकारला अशक्य व परवडेनासे झाले आहे. त्यामुळे तिथे तो मोठा राजकीय प्रश्न बनला आहे. पंजाब आणि मध्य प्रदेशामध्ये गव्हाच्या उत्पादनाबाबत हाच अनुभव आला आहे. हवामानातील टोकाच्या बदलांमुळे पिकांचे नुकसान होते तसेच कल्पनेपलिकडचे बंपर पीकही येऊ लागले आहे. आजवर टोमॅटो, कांदा किंवा भाजीपाला अशांच्या बाबतीत हे घडे व शेतकऱ्यांना माल रस्त्यावर फेकून द्यावा लागे. पण आता इतर पिकांबाबतही वाढत्या प्रमाणात असे घडू लागले आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. अशा स्थितीत आता आपल्या पीक-नियोजनात बदल करण्याची गरज निर्माण झाली आहे. तेलंगणा सरकारने काही वर्षांपासून शेतकऱ्यांनी कोणत्या भागात किती व कोणती पिके घ्यावी याचे राज्यस्तरीय नियोजन सुरु केले आहे. त्याच धर्तीवर आता महाराष्ट्रातही मर्यादित प्रमाणात अशी आखणी करावी लागणार आहे. अर्थात त्यासाठी एका पिकाला पर्याय सुचवताना तो आर्थिकदृष्ट्या तितकाच फायदेशीर असेल याची हमी सरकारला द्यावी लागेल. पर्यायी पिकाच्या खरेदीची व्यवस्थाही करावी लागेल. सध्या महाराष्ट्रात हे उसाबाबत घडते आहे. भविष्यात हीच गोष्ट कोकणात आंब्याच्या संदर्भात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. किंबहुना, यंदा हवामानाच्या लहरीपणामुळे बहुतांश भागातील आंबा उशिराने व एकदम बाजारात दाखल होत असल्याचा अनुभव सध्या आपण घेत आहोत. यामुळे सिंधुदुर्गात हापूसचा दर डझनाला दोनशे इतका खाली आला आहे. उत्पादनाचा पूर शेतकऱ्यांच्या नाका-तोंडात जाऊन प्राण कंठाशी येण्याच्या आत सरकारने कृती करायला हवी.

शिवाजी कराळे

न्यायालयीन पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष का?

पंतप्रधान नरेंद्र मोदी, विविध राज्यांचे मुख्यमंत्री तसंच न्यायमंडळातल्या वरिष्ठांची अलिकडेच एक परिषद झाली. या परिषदेत सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांनी पंतप्रधानांच्या उपस्थितीत न्यायालयात प्रलंबित दावे तसंच सरकारची त्याबाबतची भूमिका याबाबत थेट नाराजी व्यक्त केली आणि सरकारचे कान टोचले. त्यामुळे न्यायालयातल्या पायाभूत सुविधांच्या अभावाचा मुद्दा पुन्हा चर्चेला आला.

लोकसभेत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्री किरेन रिजिजू यांनी देशातल्या विविध न्यायालयांमध्ये चार कोटी ७० लाखांहून अधिक खटले प्रलंबित आहेत, असं सांगितलं होतं. या वर्षी दोन मार्चपर्यंत सर्वोच्च न्यायालयात ७० हजार १५४ तर २१ मार्चपर्यंत देशातल्या २५ उच्च न्यायालयांमध्ये ५८ लाख ९४ हजार ६० खटले प्रलंबित होते. यामध्ये अरुणाचल प्रदेश, लक्षद्वीप आणि अंदमान निकोबारमधल्या प्रलंबित प्रकरणांचा समावेश नाही. त्यात ४२ लाखांहून अधिक दिवाणी खटले आणि १६.३९ लाख फौजदारी खटल्यांचा समावेश आहे. ८६.२ टक्के प्रकरणं एका वर्षाहून अधिक काळ प्रलंबित आहेत. (अरुणाचल प्रदेश, लक्षद्वीप आणि अंदमान-निकोबारमधल्या प्रलंबित प्रकरणांचा डेटा राष्ट्रीय न्यायिक डेटा ग्रीडकडे उपलब्ध नाही.) २८.४ टक्के प्रकरणांमध्ये स्थगिती आहे. भारताच्या सर्वोच्च न्यायालयातले निबंधक न्यायालयीन पायाभूत सुविधा आणि न्यायालयीन सुविधांच्या स्थितीवर डेटा संकलित करतात. न्यायालयांसाठी पुरेशा पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी भारतीय राष्ट्रीय न्यायिक पायाभूत सुविधा प्राधिकरणाची स्थापना करण्याचा प्रस्ताव भारताच्या सरन्यायाधीशांकडून प्राप्त झाला आहे. या प्रस्तावानुसार भारताचे सरन्यायाधीश हे या संस्थेचे संरक्षक असतील. हे प्राधिकरण एक रोड मॅप तयार करेल आणि भारतीय न्यायालय प्रणालीसाठी कार्यात्मक पायाभूत सुविधांची योजना, विकास, देखरेख आणि व्यवस्थापन करण्यासाठी केंद्रीय संस्था म्हणून काम करेल.

न्यायव्यवस्थेसाठी पायाभूत सुविधा विकसित करण्याची प्राथमिक जबाबदारी राज्य सरकारांची आहे. संसाधनं वाढवण्यासाठी केंद्र सरकार राज्य सरकारं आणि केंद्रशासित प्रदेशांना निधीवाटपाच्या पद्धतीनुसार आर्थिक सहाय्य देत आहे. ही प्रणाली १९९३-९४ पासून लागू करण्यात आली आहे. आतापर्यंत, केंद्र सरकारने राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना आठ हजार ७५८ कोटी ७१ लाख रुपयांचं वाटप केलं आहे. २०१४-१५ पासून आजपर्यंत पाच हजार ३१४ कोटी ४० लाख रुपये देण्यात आले आहेत. जिल्हा आणि अधिनस्थ न्यायालयांमधला कोर्ट हॉल आणि निवासी युनिट्स, शौचालयं बांधण्याबरोबरच डिजिटल कॉम्प्युटर रूम आणि वकिलांच्या हॉलचाही या योजनांमध्ये समावेश करून विस्तार करण्यात आला आहे. २६ टक्के न्यायालय संकुलात महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहं नाहीत. १६ टक्के न्यायालयांमध्ये पुरुषांसाठी शौचालयं नाहीत. ४६ टक्के न्यायालय संकुलांमध्ये पिण्याच्या स्वच्छ पाण्याची व्यवस्था नाही. ९५ टक्के न्यायालय संकुलांमध्ये प्राथमिक वैद्यकीय सुविधा नाहीत. ७३ टक्के कोर्टरूममध्ये न्यायाधीशांकडे संगणक नाहीत. ६८ टक्के न्यायालयांच्या खोल्यांमध्ये स्वतंत्र रेकॉर्ड रूम नाही. ४९ टक्के न्यायालयांमध्ये ग्रंथालयं नाहीत. ९८ टक्के न्यायालयांमध्ये दृष्टिहीन नागरिकांच्या सोयीचे रस्ते नाहीत. ५५ टक्के न्यायालयांमध्ये हेल्प डेस्क नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत झालेल्या परिषदेत न्यायालयीन खटल्यांच्या प्रलंबावरून सरन्यायाधीशांनी कानटोचणी करण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वीही देशातील न्यायाधीशांची संख्या आणि प्रलंबित खटल्यांच्या संख्येतील तफावतीचा उल्लेख करून, सरन्यायाधीशांनी न्यायाधीशांच्या नियुक्त्यांकडे सरकारनं म्हणजे कार्यकारी मंडळानं गांभीर्यानं लक्ष द्यावं, अशी मागणी केली होती. त्या वेळी सरन्यायाधीशांना रडू कोसळलं होतं; परंतु कायदे मंडळ आणि त्यांच्या प्रमुखांच्या हृदयाला मात्र पाझर फुटला नव्हता. खटल्यांच्या विलंबांसाठी सर्रास न्यायालयांना जबाबदार धरलं जातं. उशिरा न्याय, म्हणजे नाकारलेला न्याय अशी व्याख्या केली जात असताना न्यायालयातली प्रकरणं वेगाने निकाली निघावीत, यासाठी कालबद्ध व्यवस्था असायला हवी. न्यायालयात पुरेशा पायाभूत सुविधा, न्यायाधीशांची संख्या आदींवर गांभीर्याने निर्णय घ्यायला हवेत; परंतु कार्यकारी मंडळ त्याबाबत काहीच करत नाही आणि कायदे मंडळ लॉ कमिशनच्या मदतीने काही सुधारणा करण्याचं नावच घेत नाही. त्यामुळे पूर्वीच्या सरन्यायाधीशांचं रडगाणं वाया गेलं. या पार्श्वभूमीवर आता पुन्हा एकदा सरन्यायाधीशांनी न्यायालयातल्या प्रलंबित प्रकरणांना सरकार कसं जबाबदार आहे, हे थेट पंतप्रधानांसमोर सांगितलं, हे बरं झालं. अर्थात त्याची कितपत दखल घेतली जाते, हा पुन्हा संशोधनाचा भाग आहे.

कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांच्या कार्याची घटनाकारांनी व्यवस्थित विभागणी केली आहे. त्यांचं अधिकार क्षेत्र ठरवून दिलं आहे. कुणीही कुणाच्या क्षेत्रात हस्तक्षेप करता कामा नये, याचा उल्लेख करून सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा म्हणाले की कर्तव्यं पार पाडताना सर्वांनी लक्ष्मणरेषा लक्षात ठेवली पाहिजे. कायद्यानुसार एखादी बाब होत असेल तर न्यायव्यवस्था कधीही आडकाठी आणणार नाही. काही अधिकारी आपलं काम योग्यरित्या करत नसल्यामुळे ६६ टक्के प्रकरणांना विलंब होतो.

सरकार आणि सार्वजनिक क्षेत्रातले उपक्रम यांच्यातल्या परस्पर वादावर चिंता व्यक्त करताना सरन्यायाधीश म्हणाले की, वर्षानुवर्षं न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी न झाल्यामुळे अवमानाच्या प्रकरणांमध्ये वाढ झाल्यानं एक नवी श्रेणी तयार झाली आहे. त्यामुळे न्यायालयावरील भार वाढतो. सरकारी अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे खटल्यांच्या संख्येत भरमसाठ वाढ झाल्याकडे सरन्यायाधीशांनी लक्ष वेधलं. याला सामोरं जाण्यासाठी न्यायव्यवस्थेची पायाभूत संसाधनं आणि न्यायाधीशांची संख्या वाढवणं आवश्यक आहे. राज्यघटनेत राज्याच्या तिन्ही अंगांच्या अधिकारांच्या वाटपाची स्पष्ट तरतूद आहे. त्यांची कार्यपद्धती, अधिकार क्षेत्र आणि जबाबदाऱ्या स्पष्ट आहेत. लोकशाहीचे हे तीनही अवयव समन्वयानं काम करतात. यामुळे राष्ट्राचा लोकशाही पाया मजबूत झाला आहे. सरन्यायाधीशांनी न्याय व्यवस्थेसमोरील आव्हानं आणि व्यवस्था मजबूत करण्यावर भर दिला. जमिनीचं सर्वेक्षण किंवा रेशनकार्डबाबत शेतकऱ्यांच्या तक्रारीवर तहसीलदारांनी कारवाई केली तर शेतकरी न्यायालयात कशाला येतील? महापालिका आणि ग्रामपंचायतींनी आपलं काम चोख केलं तर नागरिकांना न्यायालयाचा दरवाजा ठोठावण्याची गरज काय? महसूल विभागाने कायद्याची प्रक्रिया पार पाडून जमीन संपादित केल्यास जमिनीच्या वादविवादाचा भार पडणार नाही. सरन्यायाधीशांनी सरकारच्या आंतरविभागीय वादासाठी न्यायालयात जाण्यापुढे प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. ते म्हणाले की सरकारचे आंतरविभागीय वाद न्यायालयात का येतात, हे मला समजत नाही.

आज जवळपास ५० टक्के प्रकरणं सरकारची आहेत. पोलिसांचा तपास निष्पक्ष असेल आणि बेकायदेशीर अटक आणि कोठडीतले अत्याचार संपले तर एकही पीडित न्यायालयात येणार नाही. सरकारी वकिलांची कमतरता ही मोठी समस्या आहे आणि त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. असं असलं तरी, लोक आपल्या समस्या घेऊन आले तर न्यायालय त्यांना नाकारणार नाही, असा दिलासा सरन्यायाधीश रमणा यांनी दिला. धोरण ठरवणं हे न्यायालयाचं काम नाही; परंतु नागरिकांनी त्यांच्या समस्या मांडल्या तर न्यायालय त्यांना नकार देऊ शकत नाही. स्पष्ट विचार, दूरदृष्टी आणि लोकहिताचा विचार करून कायदे मंडळानं कायदे केले तर खटले चालण्याची शक्यता फारच कमी होईल. कायदेमंडळाने कायदा करण्यापूर्वी लोकांचं मत जाणून घेणं, विधेयकावर व्यापक चर्चा करणं अपेक्षित आहे.

न्यायमूर्ती रमणा पुढे म्हणाले की काही वेळा खटल्याची दोन मुख्य कारणं असतात. पहिलं म्हणजे कार्यकारिणीचे विविध घटक काम करत नाहीत आणि दुसरं म्हणजे विधिमंडळाला त्याची पूर्ण क्षमता जाणवत नाही. जनहित याचिकांच्या गैरवापराचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. बनावट याचिका हा चिंतेचा विषय असल्याचं त्यांनी सांगितलं. अनेक वेळा जनहित याचिका वैयक्तिक स्वारस्य याचिका (खासगी हित याचिका) असतात. जनहित महत्त्वाचं असतं; परंतु काही वेळा प्रकल्प रखडवण्यासाठी आणि सार्वजनिक अधिकाऱ्यांवर दबाव आणण्यासाठी त्यांचा गैरवापर केला जातो. आजकाल जनहित याचिकांचा वापर राजकीय आणि कॉर्पोरेट शत्रुत्वासाठीही केला जातो.

हा गैरवापर पाहता न्यायालयाने अत्यंत सावधगिरी बाळगणं आवश्यक आहे. न्यायाधीश-लोकसंख्या गुणोत्तर सुधारण्याची गरज आहे. गेल्या वर्षी उच्च न्यायालयांमध्ये सरन्यायाधीशांनी न्यायाधीश नियुक्त करण्यासाठी १२६ नावांची शिफारस केली होती. यापैकी ५० जणांची नावं भारत सरकारकडे प्रलंबित आहेत. मंजूर पदांच्या आधारे देशात दहा लाख लोकसंख्येमागे २० न्यायाधीश आहेत. ही स्थिती चिंताजनक आहे. न्यायिक पायाभूत सुविधांकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. सरन्यायाधीश रमणा यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांकडे सरकारने गांभीर्याने पाहिल्यास प्रलंबित दाव्यांचं प्रमाण नक्कीच कमी होईल. न्यायालयांनीही कालबद्ध गतीने प्रकरणं निकाली काढायला हवीत. ●

क्रिप्टो करन्सीमधील घसरण

शोलेमध्ये अमिताभ बच्चन धर्मेंद्र किती वाईट नवरा मुलगा आहे हे हेमामालिनीच्या आईला सांगताना तो दिवसभर कसा दारूच्या नशेत असतो, तो दिवसभर कसा जुआ खेळतो असे सांगतो.

जागतिक वित्त भांडवल शोलेतल्या विजयने केलेल्या वीरूच्या वर्णनासारखे आहे.

त्याच्या डीएनएमध्ये सट्टेबाजी आहे आणि त्याला सतत वर जाणाऱ्या ॲसेट मार्केटच्या नशेत राहायला आवडते.

सट्टेबाजी म्हणजे ज्याचा कोणत्याही उत्पादक कामाशी संबंध नाही असे खरेदी विक्रीचे व्यवहार.

आणि नशेत राहण्याची सवय म्हणजे उत्पादक अर्थव्यवस्थेचे काही बरे वाईट होऊद्या, यांच्या किमती एका रेषेत वर वर जातच राहतात.

त्याचे क्लासिकल उदाहरण आहे क्रिप्टो करन्सी; ज्याची काहीही उपयुक्तता नसतांना निव्वळ सट्टेबाजीसाठी शोधून काढलेला ॲसेट !

जगात गेल्या काही वर्षात शेकड्यांनी क्रिप्टो करन्सी जन्माला घातल्या गेल्या आहेत; आणि त्याच्या प्रवर्तकांनी अनेक गुंतवणूकदारांना नादी लावले आहे.

उदा. फक्त भारतात अंदाजे २ कोटी नागरिकांनी ४०,००० कोटी रुपये वेगवेगळ्या क्रिप्टो करन्सी मध्ये गुंतवले आहेत; जगात लाखो कोटी डॉलर्स जे अपेक्षित होते ते होऊ लागले आहे; क्रिप्टोच्या फुग्यातील हवा जाऊ लागली आहे. जगात सर्वात जास्त चर्चिली जाणारी क्रिप्टो करन्सी आहे बिटकॉइन.

नोव्हेंबर २०२१ मध्ये ६९,००० डॉलर्स एवढा एका बिटकॉइनचा भाव होता तो आता ३०,००० डॉलर्स वर आला आहे; सहा महिन्यात ५५ टक्के घट कॉइनबेस हे अमेरिकेतील सर्वात मोठे क्रिप्टो करन्सी चे एक्सचेंज आहे; गेल्या तिमाहीत त्याला प्रचंड तोटा झाला आहे; खरेदी विक्रीदारांची संख्या २०% कमी झाली आहे

कॉइनबेसने याच आठवड्यात जाहीर केले की हे ट्रेंड असेच सुरू राहिले तर हे एक्सचेंज दिवाळखोरीत जाईल आणि एक्सचेंजकडे असणाऱ्या वॉलेट मध्ये ठेवलेली कोट्यवधी डॉलर्सची क्रिप्टो करन्सीवर टाच येऊ शकते.

अनेक गुंतवणूकदार तोटा सहन करत क्रिप्टो मधील गुंतवणुकी काढून घेत आहेत.

गुंतवणूकदारांचा खरा विश्वगुरु वॉरेन बफेट क्रिप्टो मधील गुंतवणुकीला बकवास म्हणतो जगातील सारी बिटकॉइन कोणी मला देऊ केली तरी मी २५ डॉलर्स देखील त्याला देणार नाही म्हणतो.

जुगार, जुगाराचे अड्डे हजारो वर्षे सुरु आहेत; त्यावर नैतिक टीका मी तरी करत नाही; क्रिप्टो किंवा वित्त भांडवलवरची माझी टीका राजकीय आर्थिक भूमिकेतून आहे, नैतिकतेच्या भूमिकेतून नाही.

जुगाराच्या अड्ड्यावर जुगारी स्वतःचे पैसे, मालमत्ता लावतात, काही जिंकतात, काही हरतात, आत्महत्या करतात; ती व्यक्तिगत शोकांतिका म्हणता येईल.कॉर्पोरेट/वित्त भांडवलाला सामान्य लोकांनी देखील गंभीरपणे घेतले पाहिजे कारण ती प्रणाली समाजातील लाखो कोटी रुपयांच्या बचती/ठेवी घेऊन सट्टा खेळते म्हणून आणि सर्व देशातील शासनाला/नियामक मंडळांना त्यांनी त्यांचे आर्थिक तत्वज्ञान गळी उतरवले आहे.कॉर्पोरेट वित्त भांडवलाचे हितसंबंध सांभाळणाऱ्या शासनाकडून नजीकच्या काळात याला आवर घातला जाईल अशी शक्यता नाही.

- संजीव चांदोरकर
(अर्थ-अन्वयार्थ वरुन साभार) ●

मूर्ख व्यक्ती किंवा कृष्णभावनेतील नवसाधकांना अनेकदा कृष्णभावनेच्या ज्ञानाशिवायच कर्मातून निवृत्त होण्याची इच्छा असते. अर्जुनाच्या रणांगणावरील युद्धकर्मातून निवृत्त होण्याच्या इच्छेला भगवंतांनी मान्यता दिली नाही. मनुष्याने केवळ कर्म कसे करावे हे जाणणे आवश्यक आहे. कृष्णभावनायुक्त कर्मातून निवृत्त होऊन कृष्णभावनेचा देखावा करीत बसणे हे महत्त्वपूर्ण नाही, त्यापेक्षा श्रीकृष्णांप्रित्यर्थ कर्म करीत राहणे हेच महत्त्वपूर्ण आहे. या ठिकाणी अर्जुनाला सल्ला देण्यात आला आहे की, यापूर्वी सांगितल्याप्रमाणेच सूर्यदेव विवस्वानासारख्या भगवंतांच्या पूर्वशिष्यांनी ज्याप्रमाणे आचरण केले त्याप्रमाणे त्यांच्या पदचिन्हांना अनुसरुन अर्जुनाने कृष्णभावनाभावित कर्म करावे. भगवंत आपल्या सर्व पूर्वकर्मांना जाणतात तसेच पूर्वी ज्या लोकांनी कृष्णभावनाभावित होऊन कर्म केले त्यांचे कर्मही ते जाणतात. म्हणून ते सूर्यदेवाच्या कर्मांचे अनुसरण करण्याची शिफारस करतात. सूर्यदेवाने कर्म करण्याची ही कला भगवंतांकडून काही लोखो वर्षांपूर्वी अवगत केली. भगवान श्रीकृष्णांच्या अशा सर्व शिष्यांना या ठिकाणी पूर्वकालातील मुक्त व्यक्ती असे म्हटले आहे, कारण ते श्रीकृष्णांनी नेमून दिलेल्या कर्मांचे पालन करण्यात मग्न होते.

किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः ।
तत्ते कर्म प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ।।१६।।

किम्- काय आहे; **कर्म-** कर्म; **किम्-** काय आहे; **अकर्म-** अकर्म; **इति-** याप्रमाणे; **कवयः-** बुद्धिमान; **अपि-** सुद्धा; **अत्र-** या बाबतीत; **मोहिताः-** मोहित झाले आहेत; **तत्-** ते; **ते-** तुला; **कर्म-** कर्म; **प्रवक्ष्यामि-** मी विवेचन करुन सांगतो; **यत्-** ते; **ज्ञात्वा-** जाणून; **मोक्ष्यसे-** तू मुक्त होशील; **अशुभात्-** अशुभातून.

कर्म काय आणि अकर्म काय हे निश्चित करण्यात बुद्धिमान लोकही गोंधळून जातात. आता मी तुला कर्माचे वर्णन करतो जे जाणल्यावर तू सर्व अशुभातून मुक्त होशील.

तात्पर्य : कृष्णभावनाभावित कर्म हे भक्तांच्या उदाहरणावरुन करावयाचे असते. पंधराव्या श्लोकात याचा निर्देश केला आहे. असे कर्म स्वतंत्रपणे का करु नये यासंबंधी पुढील श्लोकात स्पष्टीकरण देण्यात येईल.

कृष्णभावनाभावित कर्म करण्यासाठी या अध्यायाच्या प्रारंभी सांगितल्याप्रमाणे मनुष्याने गुरुशिष्य परंपरेतील प्रमाणित व्यक्तीच्या आदेशानुसार आचरण केले पाहिजे. कृष्णभावनेची पद्धती सर्वप्रथम सूर्यदेवाला सांगण्यात आली, सूर्यदेवाने आपला पुत्र मनूला सांगितली, मनूने आपला पुत्र इक्ष्वाकुला सांगितली आणि अशा प्रकारे अत्यंत प्राचीन काळापासून ही पद्धत पृथ्वीवर चालत आलेली आहे. म्हणून मनुष्याने गुरुशिष्य परंपरेतील पूर्व प्रमाणित व्यक्तींच्या चरणचिन्हांचे अनुसरण केले पाहिजे. नाही तर बुद्धिमान मनुष्यही आदर्श कृष्णभावनायुक्त कर्मांबद्दल गोंधळून जातील. यास्तव प्रत्यक्ष भगवंतांनीच अर्जुनाला कृष्णभावनेचे ज्ञान देण्याचे ठरविले आणि प्रत्यक्ष भगवंतांनीच अर्जुनाला कृष्णभावनेचे ज्ञान दिल्याने, जो अर्जुनाच्या पदचिन्हांचे अनुसरण करतो तो निश्चितच गोंधळून जात नाही.

असे सांगितले जाते की, केवळ अपूर्ण प्रायोगिक ज्ञानाद्वारे धर्माचा मार्ग निश्चित करणे शक्य नाही. वास्तविकपणे धर्माचे तत्व केवळ भगवंतच सांगू शकतात. अपूर्ण व चुकीच्या तर्काच्या आधारे कोणताही मनुष्य धर्मतत्वाची निर्मिती करु शकत नाही. मनुष्याने ब्रह्मा, शिव, नारद, मनु, चतुकुमार, कपिल, प्रल्हाद, भीष्म, शुकदेव गोस्वामी, यमराज, जनक आणि बळी महाराज यांसारख्या महाजनांच्या पदचिन्हांचे अनुसरण केले पाहिजे. तर्काद्वारे धर्म अथवा आत्मसाक्षात्कार म्हणजे काय? ते जाणणे शक्य नाही. म्हणून आपल्या भक्तांवर अहैतुकी कृपा करण्यासाठीच भगवंत प्रत्यक्ष अर्जुनालाच कर्म आणि अकर्म काय याचे वर्णन करुन सांगतात. केवळ कृष्णभावनाभावित कर्म केल्यानेच भौतिक अस्तित्वाच्या जंजाळातून मुक्त होता येते

कर्मणो ह्यपि बोद्धव्यं बोद्धव्यं च विकर्मणः ।
अकर्मणश्च बोद्धव्यं गहना कर्मणो गतिः ।।१७।।

कर्मणः- कर्माचे; **हि-** निश्चितच; **अपि-** सुद्धा; **बौद्धव्यम्-** जाणून घेतले पाहिजे; **बौद्धव्यम्-** जाणून घेतले पाहिजे; **च-** सुद्धा; **विकर्मणः-** निषिद्ध कर्म किंवा विकर्म; **अकर्मणः-** अकर्माचे, **च-** सुद्धा; **बौद्धव्यम्-** जाणून घेतले पाहिजे; **गहना-** गहन किंवा अत्यंत कठीण; **कर्मणः-** कर्माचे; **गतिः-** गती, प्रवेश. **(क्रमशः)** ●

लोकसंसद

शिवकुमारांना नमन



गेली सहा-सात दशके संतूरच्या तालावर जगाला मंत्रमुग्ध करणारे आणि जम्मू-काश्मीरच्या प्रदेशातून संतूरला जागतिक पटलावर मान-सन्मान मिळवून देणारे पंडित शिवकुमार शर्मा यांचे नुकतेच हृदयविकाराने वयाच्या ८४ व्या वर्षी निधन झाले. १३ जानेवारी १९३८ रोजी जम्मू येथील संगीतकार पंडित उमादत्त शर्मा यांच्या पोटी शिवकुमार यांचा जन्म झाला आणि संतूरचा भाग्योदय झाला, असे म्हणल्यास वावगे ठरणार नाही. वयाच्या १७ व्या वर्षी जेव्हा शिवकुमार यांनी मुंबईत पहिला सार्वजनिक कार्यक्रम सादर केला, तेव्हापासून संतूर आणि भारतीय शास्त्रीय संगीत यांचे अतूट नाते निर्माण झाले. शिवकुमार आणि संतूरची लोकप्रियता पाहून १९६० मध्ये ज्येष्ठ चित्रपट निर्माते व्ही. शांताराम यांनी वसंत देसाई यांचे संगीत असलेल्या 'झनक झनक पायल बाजे' या चित्रपटात संतूरला प्रथम संधी दिली. त्यानंतर १९६७ मध्ये आलेल्या त्यांच्या 'कॉल ऑफ द व्हॅली' या अल्बम मध्ये सुप्रसिद्ध बासरीवादक हरिप्रसाद चौरसिया हे देखील शिवकुमार यांच्यासोबत जोडले गेले. यानंतर शिवकुमार शर्मा आणि हरिप्रसाद चौरसिया यांनी संतूर आणि बासरीवर जुगलबंदीची नवी परंपरा सुरू केली, जी लोकांना खूप आवडली. या दोघांनी १९८१ मध्ये शिव- हरी नावाने सिलसिला या चित्रपटाला पहिल्यांदा संगीत दिले. त्यानंतर चांदणी (१९८९), लम्हे (१९९१), डर (१९९३), फासले (१९८५) आदी चित्रपटांमध्येही त्यांना संधी मिळाली. दिवंगत श्रीदेवी अभिनित लम्हे सिनेमातील 'मोरनी बागा मा' हे गाणे खूप गाजले होते. पद्मश्री आणि पद्मभूषणसह इतर अनेक पुरस्कारांनी सन्मानित झालेल्या शिवकुमार शर्मा यांचे संतूर गायन ज्यांनी जेव्हा-जेव्हा ऐकले तेव्हा ते त्यांच्या मनात घर करून राहिले. त्यांचे संतूर ऐकताना आपण काश्मीरच्या सुंदर दऱ्याखोऱ्यात बसलो आहोत, जिथे झऱ्यांचा खळखळाट आहे आणि पक्ष्यांचा किलबिलाटही आहे, असे वाटायचे.

- विजय कोष्टी, सांगली

मोबाईल क्रांतीचे जनक काळाच्या पडद्याआड

आज प्रत्येकाच्या हातात मोबाईल आहे. अनेकांचा दिवस मोबाईलने सुरु होतो. मोबाईल मधील विविध फीचर्स सगळ्यांना आकर्षित करतात. मोबाईलद्वारे संपर्क तर साधता येतोच याशिवाय कॅल्क्युलेटर, एक्सेल, इ मेल, फोटोग्राफी, इत्यादी पर्यायसुद्धा उपलब्ध आहेत. अगदी लहानांपासून वृद्धांना मोबाईल ने वेड लाविले आहे हे खरेच !... या मोबाईलचे भारतातील जनक होते सुखराम. सुखराम हे १९९३ ते १९९६ या काळात माजी केंद्रीय दूरसंचार मंत्री होते. ते एकदा जपान मध्ये दौऱ्यावर होते. तेथे त्यांनी एका कार चालकाच्या खिशात मोबाईल पाहिला. आपल्या भारतात सुद्धा असे होईल का? अशी स्वप्ने त्यांनी पहिली अन ती खरी करून दाखविली. भारतातील पहिला मोबाईल कॉल त्यांनी त्यावेळचे पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री ज्योती बसू यांना ३१ जुलै १९९५ या दिवशी केला होता यासाठी त्यांनी नोकिया कंपनीचा हँडसेट वापरला होता. आज २७ वर्षात सारा भारत मोबाईलने व्यापला आहे. सुखराम यांचे वयाच्या ९४ वर्षी नवी दिल्ली येथे हृदय विकाराच्या झटक्याने नुकतेच निधन झाले. सुखराम यांच्यावर बेहिशोबी मालमत्ता बाळगल्या प्रकरणी १९९६ साली धाडही पडली होती. त्यानंतर ते अनेक वर्षे चर्चेत होते. यासंबंधित अनेक खटल्यांना त्यांना सामोरे जावे लागले होते. हे जरी असले तरीही त्यांच्या मोबाईल क्रांतीमुळे त्यांना भारतातील मोबाईलचे जनक म्हटले जाते. मोबाईलचे जनक म्हणून त्यांची स्मृती कायमची स्मरणात राहील

- शांताराम वाघ, पुणे

भारतात लवकरच प्लॅस्टिकचे रस्ते येणार

रस्ते डांबरापासून, सिमेंट काँक्रिटपासून तयार केले जातात सिमेंट काँक्रिटचे रस्ते तयार करण्यासाठी येणारा खर्च अधिक असतो. मात्र हे रस्ते दीर्घकाळ टिकतात. मात्र देशात लवकरच टायरचे आणि प्लॅस्टिकचे रस्ते दिसू लागतील त्यासाठी भारत सरकार काम करत असल्याचे रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी हरियाणातील नुहमध्ये वाहनांच्या स्क्रॅपिंग सेंटरच्या उद्घाटन प्रसंगी म्हटले आहे. तसेच देशातील प्रत्येक जिल्हावार स्क्रॅपिंग सेंटर उघडण्याची सरकारची योजना आहे केंद्र सरकारच्या वाहन धोरणामुळे प्रदूषण कमी होईल. कमी खर्चात या क्षेत्राची उत्पादन क्षमता वाढेल. वाहने जुनी झाल्यावर त्यातून मिळणाऱ्या भंगारातील काही वस्तूंचा वापर रस्ते निर्मितीसाठी करण्यात येणार आहे. प्लास्टिक व वापरलेल्या टायरपासून रस्ते निर्मितीच्या पद्धतीचा शोध भारतीय संशोधक राजगोपाल वासुदेवन यांनी लावल्याचे समजते. आत्तापर्यंत देशात ७०३ किमी प्लॅस्टिकचे रस्ते बनवले गेले आहेत. स्क्रॅपेज धोरणामुळे जुनी वाहने रस्त्यावर येणार नाहीत त्यामुळे प्रदूषण कमी होण्यास मदत होवून वाहन निर्मिती क्षेत्रास चालना मिळणार असून रोजगार निर्मिती होणार आहे. निश्चितच हा निर्णय स्वागतार्ह असाच आहे !! **- राजू जाधव,** मांगूर ●

कामोठे वसाहतीत महिला असुरक्षित

फसवणूक, सोनसाखळी चोरीच्या घटनेमध्ये वाढ
नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

। पनवेल । वार्ताहर ।

कामोठे वसाहतीतील ३३ वर्षीय महिला रस्त्याने पायी आपल्या घरी जात असताना पाठीमागून आलेल्या चोरट्यांनी त्या महिलेच्या हातामध्ये असलेली बॅग हिसकावल्याची घटना कामोठे वसाहतीत घडली आहे. तर, दुसऱ्याच दिवशी एका महिलेच्या गळ्यातील चेन व लॉकेट चोरून नेले आहे. मात्र, कामोठेमध्ये बतावणी, फसवणूक व सोनसाखळी चोरीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले असल्याने नागरिक असुरक्षित असल्याच्या प्रतिक्रिया देत आहेत.

सेक्टर २२ येथील नीलकंठ ग्रीन येथे राहणारी ३३ वर्षीय महिला आपल्या परिवारासह कामोठे वसाहतीत राहत आहे. त्या महिलेचे सेक्टर २१ येथे फॅमिली सलून पार्लर आहे. यावेळी नेहमीप्रमाणे आपला पार्लर बंद करून आपल्या घराकडे निघाल्या होत्या. त्या महिलेला रस्त्यामध्ये टीजेएसबी बँकेचे एटीएम दिसले, व त्या एटीएममध्ये पैसे टाकण्यासाठी गेल्या होत्या, त्यानंतर पुन्हा बाहेर येत पायी घराकडे जात असतानाच खांद्यावर ठेवलेली पर्स बॅग सेक्टर २२ येथील शिवनेरी सोसायटीजवळ आले असता पाठीमागून आलेल्या दोघेजण बाईकस्वार अज्ञात व्यक्तींनी जबरी चोरीच्या बेताने त्या महिलेचं गळ्यातील बॅग हिसकावली व नौपाडा गावाकडे जाणाऱ्या रस्त्याकडे पसार झाले. यावेळी त्या बॅगमध्ये मोबाईल फोन, सोन्याची साखळी, अंगठी, व इतर दागिने असे एकूण ५४ हजार रुपये किमतीचे ऐवज चोरी झाल्याची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, अधिक तपास पोलीस करीत आहेत.

काही दिवसापूर्वी अशा अनेक घटना कामोठे वसाहतीत घडल्या आहेत. त्यामुळे येथील नागरिकांसह महिला असुरक्षित असल्याच्या प्रतिक्रिया कामोठेकर देत आहेत. तर, दुसऱ्या घटनेत ८७,५००/- रु. किमतीची एक सोन्याची चेन चोरली. कामोठेतील सेक्टर १८ येथे राहणारी ५४ वर्षीय महिला रोज सकाळी पायी चालत जात असे. ही महिला नेहमीप्रमाणे भूमीरत्न को.ऑ. सोसायटी या बिल्डिंगबाहेर रस्त्यावर चालत जात असताना पाठीमागून अज्ञात दोन बाईकस्वार यांनी रस्त्यावर चालणाऱ्या महिलेच्या गाळ्यात असलेली ८७,५००/-रु. किमतीची सोन्याची चेन व त्याला असलेला लॉकेट जबरदस्तीने खेचून घेऊन मानसरोवर रेल्वे स्टेशनकडे पसार झाले असल्याची घटना घडली आहे.

एमजीएम रुग्णालयात चार वर्षीय मुलाचा मृत्यू

। नवीन पनवेल । वार्ताहर ।

कामोठे एमजीएम रुग्णालयात एका चार वर्षीय मुलाचा मृत्यू झाला आहे. हॉस्पिटलमधील टेक्निशियनने या मुलाला इंजेक्शन दिल्यानेच मुलाचा मृत्यू झाल्याचा आरोप केला जात आहे. याप्रकरणी मृत मुलाचा शवविच्छेदन अहवाल आणि डॉक्टरांच्या समितीचा अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल, असे पोलिसांनी सांगितले आहे.

अर्जुन नेपाळी याच्या पाठीवर गाठ आली होती. यासाठी त्याला एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी आणले होते. एमजीएम रुग्णालयातील टेक्निशियनने दिलेल्या चुकीच्या इंजेक्शनमुळेच त्या मुलाचा जागीच मृत्यू झाल्याचा आरोप कुटुंबीय आणि मनसे कार्यकर्त्यांकडून केला जात आहे. या चार वर्षीय मुलाच्या मृत्यूनंतर टेक्निशियन फरार असल्याचे समोर आले आहे. याबाबत मयत मुलाच्या कुटुंबियांनी मनसेचे पनवेल शहराध्यक्ष योगेश चिले यांच्याकडे तक्रार केली. त्यांनी हॉस्पिटलमध्ये जाऊन प्रशासनाला जाब विचारला व पोलीस ठाणे गाठले. यावेळी प्रशासन आणि चुकीचे इंजेक्शन देणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी योगेश चिले, पराग बालड यांनी केली आहे.

म ह त्त्वा चे

लॅपटॉप, चेकबुकची चोरी

। नवीन पनवेल । वार्ताहर ।

पनवेल शहरातील एका घरात प्रवेश करून चोरट्यांनी वीस हजार रुपये किमतीचा लॅपटॉप आणि चेक बुक चोरी केल्याची घटना घडली आहे. चोरट्यांच्या विरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राचीन हेल्थ केअर हॉस्पिटलजवळ गोविंद निलायम को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीमध्ये वेमुला रेड्डी राहतात. त्यांना त्यांच्या रूमच्या बाहेरील दरवाजा उघडा असल्याचे दिसले. त्यांनी आत जाऊन पाहिले असता लॅपटॉपची बॅग दिसून आली नाही.

तरुणाचा मृत्यू

। पनवेल । वार्ताहर ।

२० व्या मजल्यावरून पनवेल कोन येथील इंडिया बुल्सच्या इमारतीवरून खाली पडून वैभव जैन (२६, रा. राजस्थान) याचा मृत्यू झाला आहे. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, त्याने आत्महत्या केली की तो खाली पडला, याचा शोध पनवेल तालुका पोलीस करत आहेत.

पुरस्काराचे वितरण

। अलिबाग । वार्ताहर ।

सुनिर्मल फाऊंडेशनच्या वतीने सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक, वैद्यकीय आणि पत्रकारिता क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी सुनिर्मल गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. याही वर्षी रविवार, दि. २२ मे रोजी सकाळी दहा वाजता हा पुरस्कार वितरण समारंभ मुंबईत होणार आहे. इच्छुकांनी अधिक माहितीसाठी दत्ता खंदारे यांच्याशी ९६९९३१३६२१ वर संपर्क साधावा.

राजेंद्र टेमकर, रुद्राक्षी टेमकर यांना पुरस्कार जाहीर

। भाकरवड । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील कमळपाडा गावचे रहिवासी राजेंद्रकुमार धर्माजी टेमकर यांना समता साहित्य अकादमीच्या वतीने देण्यात येणारा सन २०२२ चा 'शिक्षकरत्न समता पुरस्कार', तर क्रीडा क्षेत्रातील क्रीडारत्न समता पुरस्कार रुद्राक्षी मनोहर टेमकर, रा. उरण, जि. रायगड हिला जाहीर करण्यात आला आहे.

दरवर्षी देण्यात येणारे पुरस्कार यावर्षी राजेंद्र टेमकर यांना त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उत्तुंग कामगिरीबद्दल देण्यात येणार आहे. त्यांना यापूर्वी २०१९ मध्ये 'कुलाबा जीवन गौरव' पुरस्कारानेदेखील सन्मानित करण्यात आले आहे. तर, रुद्राक्षी मनोहर टेमकर हिने अवघ्या नऊ वर्षाची असून, या लहान वयात तिने रेवस ते गेटवे ऑफ इंडिया आणि धरमतर ते मांडवा असा विविध सागरी जलतरण मोहिमा यशस्वीरित्या पार पाडून नवनवीन विक्रम प्रस्थापित केले आहेत.

समता साहित्य अकादमी, यवतमाळ यांनी या दोन्ही गुणिजनांच्या उत्तुंग कामगिरीची दखल घेत यावर्षीचे दोन्ही राष्ट्रीय पुरस्कार जाहीर केले असून, हा पुरस्कार वितरण सोहळा २८ मे रोजी दामोदर नाट्यगृह, परळ-मुंबई येथे दिग्गज मान्यवरांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

चौकशी अधिकाऱ्यांच्या पॅनेलसाठी अर्ज

। अलिबाग । वार्ताहर ।

महाराष्ट्र सहकारी संस्था अन्वये चौकशी, प्राधिकृत अधिकारी यांची नामतालिका तयार करण्यासाठी सहकार खात्यातून निवृत्त झालेले अधिकारी, निवृत्त न्यायाधीश, वकील चार्टर्ड अकाऊंटंट यांच्याकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जाचे नमुने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण, जिल्हा उपनिबंधक/सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयात दि. ११ मे ते दि. १० जून २०२२ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळू शकतील. या अर्जासोबत आधारकार्ड, पॅनकार्ड, रहिवासी पुरावा, जन्मतारीख पुरावा, शैक्षणिक अर्हतेसंबंधी कागदपत्रे (पदवी प्रमाणपत्र) वकील असल्यास बार कौन्सिल सर्टिफिकेट जोडावे, अनुभवासंदर्भात आवश्यक कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

'आपत्तीकाळात सूचनांचे काटेकोर पालन करा'

। सारळ । वार्ताहर ।

आपत्तीच्या काळात सरकारी सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन आपत्ती सुरक्षा तज्ज्ञ जयपाल पाटील यांनी केले. सारळ ग्रामपंचायतीच्या वतीने आयोजित केलेल्या शिबिरात ते बोलत होते. या शिबिराचे उद्घाटन सरपंच अमृता अमित नाईक यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी त्या म्हणाल्या की, गावातील प्रत्येकाला आपत्तीच्या वेळी नेमके काय करावे यासाठी रायगड जिल्हा परिषदेने रायगडचा युवक फाऊंडेशनच्या सहकार्याने या शिबिराचे आयोजन करून आम्हाला सतर्क केले आहे. यावेळी व्यासपीठावर सरपंच अमृता नाईक, उपसरपंच संजय पाटील, आपत्ती सुरक्षा तज्ज्ञ जयपाल पाटील, योग शिक्षक सुहास गानू, ग्रामपंचायत सदस्य प्रज्ञा पाटील, कीर्ती पाटील, निलेश कडवे, तलाठी रिना म्हात्रे, पोलीस पाटील अश्विनी पाटील आदी मान्यवरांसह गावातील तरुण मुले, मुली, ज्येष्ठ नागरिक, महिला आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रामविकास अधिकारी निशा चंदनकर यांनी केले. जयपाल पाटील यांनी घराशेजारी असलेल्या दरडीबाबत धोके व बचाव, घरातील गॅस गिझर इलेक्ट्रिकल साधने, महाराष्ट्र शासनाचा आपत्ती व्यवस्थापन कायदा, पाणी वाचवण्याबाबत माहिती, महिलांच्या सुरक्षेसाठी महाराष्ट्र पोलीस आमचा ११२ क्रमांकाचा वापर कसा करता येतो याचे प्रात्यक्षिक दाखविताच २० व्या मिनिटात मांडवा पोलीस ठाणे येथील पोलीस हवालदार कल्पना ठाकूर व बाळंत महिलेस रुग्णालयात नेण्यासाठी शासनाच्या आरोग्य खात्याची असलेली १०२ क्रमांकाची रुग्णवाहिका कशी गावात येऊ शकते त्याचे प्रात्यक्षिक करता आरोग्य केंद्र पेढांबे येथून डॉ. वासुदेव गुट्टे, चालक स्वप्नील पाटील त्यांनी येऊन माहिती दिली.

महिलेला वाहनाची धडक

। नवीन पनवेल । वार्ताहर ।

दापोली-रत्नागिरी येथून उलवे, नवी मुंबई येथे जाण्यासाठी निघालेली महिला रस्ता समजत नसल्याने कारमधून खाली उतरली व दुसऱ्या कारने तिला जोरात धडक दिली व कार चालक पळून गेला. या अपघातात सुनीता शिंदे जखमी झाल्या आहेत. पळून गेलेल्या कार चालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एमएच ०८ ए एन २६४३ मध्ये ज्ञानेश्वर शिंदे त्यांची पत्नी सुनीता व मुलगी आर्या हे दापोली येथून उलवे येथे जाण्यासाठी निघाले. पळस्पे फाटा येथे आले असता जेएनपीटीकडे जाणाऱ्या रोडने टी पॉईंट ब्रिजच्या खाली ते आले. यावेळी रस्ता समजत नसल्याने त्यांची पत्नी सुनीता ही रस्ता विचारण्यासाठी कारमधून खाली उतरली. रस्त्याने जाणाऱ्या व्यक्तीकडे पत्ता विचारून त्या परत कारकडे येत असताना एका पांढऱ्या रंगाच्या स्वीफ्ट कारने सुनीता यांना जोरात धडक दिली.

पान १ वरुन

डोलवी एमआयडीसीला विरोध

या प्रकल्पातील खारजांभेळा, खारचिर्बी, खारढोंबी या गावातील जमिनी शासनाने भूसंपादनातून वगळण्याचा निर्णय घेतला असला तरी कोलवे, बेणेघाट, वावे,डोलवी, कारावं, खारमांचेळा, खारकारावी या गावातील जमिनी या प्रकल्पासाठी संपादित करण्यात येणार असल्याने या संदर्भात जमीन मोजणी नोटीस येथील शेतकऱ्यांना देण्यात आली. या नोटिसी शेतकऱ्यांनीनी स्वीकारल्या नाहीत. कोलवे येथे येथील प्रकल्पग्रस्त शेतकरी एकत्र जमून या मोजणीस विरोध केला. ज्या प्रमाणे तीन गावे वगळण्याचा निर्णय शासनाने घेतला त्याच प्रमाने या प्रकल्पातील सर्व गावे भूसंपादनातुन वगळुन हा प्रकल्पच शासनाने रद्द करावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली.

प्रकल्पामुळे उपजिविकेचे साधन नष्ट

या भूसंपादनामुळे शेतकऱ्यांचे उपजिविकेचे साधन नष्ट होणार आहे.गावाचा विस्तार करण्यासाठी जागाच शिल्लक राहाणार नाही. तर अनेकांचे छोटे मोठे व्यवसाय या जागेत आसल्याने अनेकांचा रोजगार जाणार आहे त्यामुळे त्यामुळे या भूसंपादनाला शेतकऱ्यांचा विरोध आहे. हे भूसंपादन रद्द करावे अशा हरकती उपविभागिय अधिकारी कार्यालय पेण येथे शेतकऱ्यांनी नोदविल्या असताना आम्हाला विश्वासात न घेता हा प्रकल्प लादला असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

पालकमंत्र्यांच्या आश्वासनाची ऐशीतैशी

कन्स्ट्रक्शन राजकीय पक्षाच्या नेत्यांना हाताशी धरून बेडीसगाव येथे वादग्रस्त खोदलेल्या रस्त्याचे काम सुरु केले. त्यावेळी स्थानिक ग्रामस्थांनी ठेकेदाराला अडविण्याचा प्रयत्न केला असता आम्हाला रायगड जिल्हा परिषद बांधकाम विभागाने नवीन जागेतून रस्ता करायला सांगितले आहे असे ठेकेदार आदिवासी लोकांना सांगत होता. तर तेथे उपस्थिती असलेले जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे शाखा अभियंता प्रल्हाद गोपणे यांनी रस्त्याचे काम नियमानुसार सुरु असल्याचे सांगून ग्रामस्थांचे म्हणणे ऐकून घेतले नाही. शेलू ग्रामपंचायत चे माजी सदस्य मंगळ दरवडा यांनी स्थानिक आदिवासी लोकांसह रस्त्याचे काम अडविण्याचा प्रयत्न केला,त्यावेळी नेरळ पोलीस ठाण्याचे अधिकारी दरवडा यांना सुरु असलेली काम थांबवू नका अशी सूचना करीत होते. तसेच नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी देखील रस्त्याचे काम पूर्ण करून घेण्यासाठी बंदोबस्त देत होते.त्यामुळे बेडीसगाव मधील आदिवासी ग्रामस्थांचे काही चालले नाही.शेवटी ग्रामस्थांचा विरोध असून देखील बेडीसगाव ला जाणारा रास्ता बनविण्यात आला.

पालकमंत्री प्रभावहिन

रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी या रस्त्याच्या प्रश्नावर बैठक घेणार असे पालकमंत्री यांनी सांगितलेले असताना ती बैठक होत पर्यंत महाराष्ट्र ग्रामीण विकास यंत्रणा यांचे अधिकारी थांबू शकत नाही. याचा अर्थ पालकमंत्री यांची प्रशासनावर कमांड नाही असा अर्थ बेडीसगाव मधील आदिवासी यांच्याकडून काढला जात आहे. पालकमंत्री यांच्याकडून आदेश असताना ठेकेदार कंपनी कडून दुसऱ्या दिवशी रस्त्याचे काम पोलीस बंदोबस्त लावून कसे काय केले जाऊ शकते आणि पोलीस बंदोबस्त मिळावा यासाठी ठेकेदाराने किंवा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्याकडून रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाकडे मंजुरी कधी घेतली असे अनेक प्रश्न बेडीसगाव मधील ग्रामस्थ यांनी उपस्थित केले आहेत.

सरकारी यंत्रणा यांचा गैरवापर करून ठेकेदाराने अधिकारी वर्गाला हाताशी धरून आपल्या मर्जीप्रमाणे

करावी अशी मागणी आम्ही वरिष्ठ पातळीवर करणार आहोत.

मंगळ दरवडा- ग्रामस्थ

लिपनिवावे पूल सुरू होणार

या मार्गावरील पूर्ण प्रवास ठप्प होत असे ऐन वेळी या पट्ट्यातील दळणवळणाचा मोठा प्रश्न निर्माण होत असे आता मात्र तब्बल दोन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर हा पूल येत्या काही दिवसात पूर्ण होत असून सर्व वाहततुकीसाठी खुल करण्यात देखील येणार असल्याचं चित्र समोर आहे. तब्बल ५ कोटी खर्च करून हा पूल तयार करण्यात आला आहे उर्वरित पुलाच्या प्रवेशद्वारावरील मातीचा भराव अभावी हे काम रखडल. होत मात्र यासाठी देखील १ कोटी ३४ लाख मंजूर करून अखेर हे काम सुरु करण्यात आलंय येत्या काही दिवसात हा पूल सर्व वाहतुकीसाठी खुल होणार असल्याने प्रवासी तसेच स्थानिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे

लालपरी जोमात

नकळत जास्तीचा भाडा घेउन काळी पिवळी राणी जोमाने धावत होती. यामध्ये नागरिकांना आर्थिक भूर्दंडाला सामोरे जावे लागे. रायगड जिल्हयातील महाड-१३२, अलिबाग-२२६, पेण-३४३, श्रीवर्धन-२००, कर्जत-२३८, रोहा-२३४, मुरुड-६९, माणगाव-२१३ या आठ आगारांमधील एकूण १६९८ एसटीच्या फेऱ्या आत्तापर्यंत सुरु झाल्या आहेत. मात्र रायगड जिल्हयातील विक्रम, मिनीडोअर, इको यांच्या फेऱ्यांवर मोठा परिणाम झाला आहे. जवळपास रोजच्या धंदामध्ये २५ ते ३० टक्क्यांची घट होउ लागली आहे.

विद्यार्थ्यांची पायपीट थांबली

आज प्रथमिक व माध्यमिक उच्च माध्यमिक शाळांना उन्हाळ्याची सुट्टी लागली असली तरी महाविद्यालयीन शासकीय तंत्र निकेतन आयटीआय यांच्या सह अनेक शासकीय कोर्स मध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांना एसटीमार्फत विद्यार्थ्यांना प्रवासामध्ये सवलत दिली जाते. यात ग्रामीण भागातून शहरात शिकण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिक फायदा होता. सहा महिन्यांपासून सुरु असलेल्या संपामुळे विद्यार्थ्यांना अनेक किलोमीटरची पायपीट करावी लागत होती कारण खाजगी वाहनातून प्रवास करणे सर्वसामान्य विद्यार्थ्यांना शक्य होत नव्हते. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर कर्मचारी कामावर रुजू झाल्याने एसटी सेवा पूर्ववत झाली. त्यामुळे विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा सवलतीचा लाभ मिळू लागला आहे. परिणामी, मैलांची पायपीट विद्यार्थ्यांची थांबली आहे.

धंदयात २५ टक्केंनी घट -

संपाच्या काळात माझ्या विक्रम, मिनीडोअर, इको चालकांनी त्यांच्या परिने सर्वसामान्यांची सेवा केली. महागाईचा आणि इंधन दर वाढीचा विचार करता एसटी पेक्षा काही प्रमाणात आमचे भाडे नक्कीच जास्त असेल, परंतु सेवा देतांना आम्ही कोठेही कमी पडलो नाही. एसटी सुरु होणे ही काळाची गरज आहे. कारण ज्या प्रमाणाने आमचे कुटुंब आहेत त्याच प्रमाणाने एसटी वाहक चालक यांना देखील कुटुंब आहेत. एसटी सुरु झाल्याने रोजच्या धंदयावर २५ टक्क्यांनी परिणाम झाला आहे. असे असतांना देखील माझ्या चालक- मालकांची काहीही तक्रार नाही.

विजय पाटील जिल्हा अध्यक्ष विक्रम मिनीडोअर चालक -मालक संघटना

लोखंडी पाईप चोरी प्रकरणात

मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्याकडे लेखी तक्रार देत चोरट्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. या चोरीत खुद्द सरपंच प्रशांत मिसाळ यांचा सबंध असल्यानेच गुन्हा दाखल करण्यात टाळाटाळ केली जात असल्याचे आरोप देखील ग्रामस्थांनी दिलेल्या तक्रारीत केला असल्याने खळबळ उडाली आहे.

ग्रामपंचायत कोर्लईच्या सन २०१२-२०१३ साली शासनाने भारत निर्माण योजनेअंतर्गत कोर्लई गावाला पाणी पुरवठा करण्याकरीता फडसाड धरण ते कोर्लई गांव अशी ११ किलोमीटर लांबीची पाणी पुरवठा करण्याकामी ४ इंच जीआय (लोखंडी पाईप) टाकण्यात आले होते. आता सन २०२२ साली कोर्लई ग्रामपंचायतीस नविन पाईप लाईन मंजूर झाल्याने फणसाड धरण ते कोर्लई अशी नविन पाईपलाईन टाकण्याचे काम ठेकेदारातर्फे काम चालू असता आहे. ना सन २०१२-२०१३ साली पाणी पुरवठा करण्यासाठी टाकण्यात आलेले पाईप काढून नविन पाईप टाकण्याचे काम चालू आहे.

परंतु सरकारी मालमत्ता असलेले ग्रामपंचायतीचे जुन्या ११ किलोमीटरच्या पाईप लाईनचे लोखंडी पाईप हे ग्रुप ग्रामपंचायत कार्यालयात जमा न करता सदर लोखंडी पाईपांच्या मालमत्तेचा अपहार करून चोरी करण्यांत आली आहे. सदरच्या जुन्या पाईप लाईनच्या संदर्भात ग्रामपंचायत कोर्लईमध्ये पाईप लाईन जमिनीतून काढण्याचा किंवा तीची विक्री करण्याचा कोणताही ठराव घेण्यात आलेला नाही, विक्री किंवा लिलाव करण्याच्या संदर्भात ग्रामपंचायतमध्ये कोणताही ठराव घेतलेला नाही. ग्रामपंचायतीचे विद्यमान सरपंच प्रशांत जानू मिसाळ यांचा पाईप चोरीशी व विक्री करण्याच्या संदर्भात संबंध असल्याचे नागरिकांकडून संशया बरोबरच आरोप केला जात आहे.

चोरी केलेल्या पाईपांची वाहतूक करणार टेम्पो क्रमांक एमएच ०६ बीडब्ल्यू ६०२० टेम्पो चालकास रंगेहाथ पकडून रेवदंडा पोलीस ठाण्यात जमा केला आहे. सदरच्या टेम्पोवाल्यास विचारले असता त्याने सदरचे चोरीचे पाईप हे रेवदंडा बंदर येथून घेतले तर रेवदंडा बंदर येथे ग्रामस्थांनी चौकशी केली असता रेवदंडा बंदर येथील वैभव महालकर यांनी ट्रकने आणल्याचे सांगितले आहे. रेवदंडा पोलीस ठाण्याचे पोलिस हे वेलकाढूपणा करून सरकारी मालमत्तेची अप्रामाणिकपणे चोरी करणाऱ्यांना अभय देत आहेत.

तरी सदरच्या सरकारी मालमत्ता असणाऱ्या पाईपांची चोरी तसेच चोरीची मालमत्ता असल्याचे माहीत असतानाही तिचा स्विकार करून ती लपवून ठेवण्यासाठी साहय करणे, मालमत्तेचा अप्रामाणिकपणे समान उद्देश साध्य करण्यासाठी चोरीच्या मालमत्तेचा नित्यक्ष: व्यवहार करणे या संबंधित पाईप चोरांच्या विरोधात भा.द.वि. कलम ३७८, ३७९, ४१०, ४११, ४१३४१४, ४०३ व ३४ प्रमाणे तात्काळ गुन्हे नोंदविण्याचे आदेश रेवदंडा पोलिसांना देण्यात यावेत अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

शिवसेनाप्रमुख, मुख्यमंत्री यांचा अपमान

यांचा अपमान झाला असल्याची भावना कट्टर शिवसैनिकांनी व्यक्त केली आहे.

जित उत्सव मंडळ व बैलगाडा नियोजन समिती अलिबाग रायगड यांच्या वतीने चाळमळा थळ येथे आमदार महोदयांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने या शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. आमदारांवरील प्रेमापोटी संपूर्ण अलिबाग विधानसभा मतदारसंघात लावण्यात आलेल्या या बॅनरमुळे आमदारांची प्रतिमा मुख्यमंत्री तसेच हिंदुहृदयसम्राट यांच्या पेक्षा मोठी कशी असा सवाल कट्टर शिवसैनिक व शिवसेना प्रेमी नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

पेण नगरपालिकेचा डोळा विक्रम स्टँडवर

इमारतीसाठी नगरपालिका हट्ट धरत आहे. नियमानुसार भाजी मार्केटच्या नावाने बांधण्यात आलेल्या कमर्शियल इमारतीला सभोवताली रस्ता ठेवणे हे गरजेचे होते. ज्यावेळेला सदरील इमारतीचे बांधकाम आराखडा तयार करण्यात आला त्यावेळी या इमारतीच्या सभोवताली रस्ता प्रस्तावित होता, मात्र नंतरच्या काळात अस काही घडल की, या इमारतीच्या सभोवतालील रस्ता गायब झाला. व ही झालेली चुक दुरूस्त करण्यासाठी नगरपालिका प्रशासन विक्रम मिनिडोअर चालकांवर कागदी घोडे नाचवून बळजबरीने त्यांना काढू पाहत आहेत.

पेण शहरातील एस.टी.स्टँड समोरील अंतिम भूखंड क्र.१०० मध्ये विक्रम-मिनीडोअर चालकांचा १९९७ पासून वावर आहे. तसेच त्यावेळी तत्कालीन नगरपालिकेच्या सत्ताधाऱ्यांनी सुरक्षेच्या दृष्टीने या थांब्यावर लोखंडी रॅलिंग तयार केली होती. जेणेकरून विक्रम चालकांमध्ये नंबरवरून वाद होवू नये व शिस्तीने धंदा करता यावा. कारण ही जागा पेण नगररचना आराखडयामध्ये (नकाशामध्ये) टांगा, टॅक्सी स्टॅन्ड म्हणून आरक्षित आहे. जुलै २००८ ला या थांब्यावर तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी मातीचे डंम्पर खाली केले होते. परंतु, त्यावेळेला सत्ताधारी विरूध्द विक्रम-मिनीडोअर चालक-मालक संघटनेचा मोठा संघर्ष झाला. या संघर्षाच्या वेळी विक्रम-मिनीडोअर, चालक-मालक संघटनेच्या वतीने आंदोलन सम्राट विष्णूभाई पाटील व नगराध्यक्षा प्रितम पाटील यांचे दिर वैकुंठ पाटील लढले होते. त्यावेळेला त्यांनी सांगितले होते की, कायद्यानुसार ही जागा टांगा, टॅक्सी स्टॅन्ड म्हणून आरक्षित आहे. त्यामुळे माती काढून विक्रम-मिनीडोअर वाल्यांना जागा खाली करून द्यावी व तत्कालीन प्रशासनाने कायद्याच्या चौकटीत राहून ही जागा खाली करून दिली होती.

विक्रम मिनीडोअर संघटना या स्टॅन्डमध्ये विस्तारीत सुधारणा करण्याच्या तयारीत असतानाच दि. २४ जुलै २०१८ रोजी पेण नगरपालिकेने उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, पेण यांना एक पत्र दिले होते. त्या पत्रामध्ये असे नमूद केले होते की, अंतिम भूखंड क्र.१०० हा पेण नगरपालिकेच्या दुसऱ्या सुधारीत मंजूर विकास आरखडयामध्ये भाजी मार्केटच्या विस्तारासाठी ठेवण्यात आलेला आहे. मात्र ११ मे रोजी प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार यांच्या दालनात झालेल्या बैठकीमध्ये नगरपालिकेचे बांधकाम अभियंता विनायक बनसोडे यांनी सांगितले की, अंतिम भूखंड क्र.१०० हा पार्किंगसाठी आरक्षित आहे. याचाच अर्थ नगरपालिका वेळोवेळी विक्रम मिनिडोअर चालक-मालक संघटनेच्या डोळयात धूळ फेक करत आहेत. हे सिध्दच होत आहे. यावेळी नगरपालिकेकडून मुख्याधिकारी जीवन पाटील,तहसिलदार स्वप्नाली डोईफोडे, बांधकाम अभियंता विनायक बनसोडे, विक्रम मिनीडोअर संघटनेचे अध्यक्ष विजय पाटील, व त्यांचे सहकारी तसेच प्रांताधिकारी आणि स्थानिक आमदार रविशेठ पाटील यांच्या मध्ये बऱ्याचवेळ चर्चा झाली मात्र या चर्चेमध्ये नगरपालिकेचे अधिकारी अंतिम भुखंड क्र. १०० मधून दोन ठिकाणहून रस्ता नेण्यासाठी आग्रही दिसले. व स्वतःची चूक कबूल करण्यास तयारी दाखविली नाही त्यावेळी नगरसेवक संतोष पाटील यांनी सर्व तांत्रिक बाबी काय आहेत याबाबत सविस्तर माहिती दिली. आणि नगरपालिकेची काय चुक आहे हे ही दाखवून दिले. त्यावेळी मुख्याधिकाऱ्यांनी नगरपालिकेची तांत्रिक चुक असल्याचे कबूल करून एकावेळी २५ गाडया उभ्या करण्याची सुविधा देण्याचे आश्वस्त केले. परंतु विक्रम मिनीडोअरचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना हे मान्य नव्हते. त्यांना एका वेळी ७२ गाडया उभ्या करण्याची सुविधा उपलब्ध व्हावी यावर ते ठाम राहिले. त्यावर स्थानिक आमदारांनी त्यांना सांगितले की, सदरील जागा नगरपालिकेची आहे त्यावर तुमचा हक्क नाही. नगरपालिकेला हवे असेल तेच नगरपालिका करणार मात्र त्यावेळी एकच गोंधळ उडाला त्यावेळी प्रातांनी मध्यस्थी करून रस्त्यासाठी लागणाऱ्या जागेसाठी नव्याने मोजणी करण्यासाठी आदेश दिले व या कामी पेण मंडळअधिकारी व तलाठी मदत करतील या गोष्टीवर विक्रम मिनिडोअरवाले राजी होउन दोन दिवसाच्या आत मोजणी करण्यास सांगितले. मात्र नगरपालिकेच्या प्रशासनाचा चुकीचा फटका विक्रम मिनिडोअर चालक-मालकांना बसल्याशिवाय राहणार नाही. यात काही शंकाच नाही.

पालिकेची अडवणूक

रायगड जिल्हा विक्रम-मिनिडोअर चालक-मालक संघटनेचे अध्यक्ष विजय पाटील यांनी सांगितले की, पेण वगळता सगळीकडे अधिकृतरित्या विक्रम मिनिडोअर चालकांना थांबे दिलेले आहेत. मात्र पेण नगरपालिका मुद्दामहून अडवणूक करून सर्वसामान्यांच्या भावनांशी खेळत आहेत. मात्र आमच्या हक्काची जागा आम्ही काहीही झाल तरी सोडणार नाही. कारण अगोदरपासूनच ही जागा टांगा असो किंवा टॅक्सी मिनिडोअर असो यांसाठी आरक्षित आहे. तसेच अंतिम भुखंड १०० हा पार्किंग म्हणून टी.पी. च्या आराखडयात आरक्षित आहे. असे असताना देखील नगरपालिका प्रशासन चुकीच्या पद्धतीने आम्हाला त्रास देत आहे. हा त्रास आम्ही कदापी सहन करणार नाही, नगरपालिकेला जे करायचे आहे ते करू द्या. आमच्या हक्काची जागा आम्ही सोडणार नाही.

जागा नगरपालिकेची आह -आ.रविशेठ पाटील

आ.रविशेठ पाटील यांनी विक्रम मिनिडोअर चालक-मालक संघटनांना खडसाउन सांगितले की, अंतिम भूखंड क्र. १०० ही जागा नगरपालिकेच्या मालकीची आहे. त्यामध्ये त्यांनी काय करावे आणि काय करु नये हे सर्व हक्क त्यांचे आहेत. त्यामुळे नगरपालिकेला जे करायचे आहे तेच करणार मात्र तुम्ही संघटनेवाले आडवे जाउ शकत नाहीत. यावरून एवढे निश्चित की, विक्रम मिनीडोअर वाल्यांना शासनाने व लोकप्रतिनिधींनी वाऱ्यावरच सोडलेले आहे जरी जागा नगरपालिकेची असली तरी त्यावर आरक्षण हा कायदेशीर पार्किंग म्हणून आहे. पार्किंगच्या राखीव जागेतून नियमानुसार रस्ता काढता येत नाही हे ही तेवढेच सत्य आहे. ही बाब स्थानिक आमदारांच्या लक्षात आली कशी नाही. अगर आली असली तर नजरअंदाज तर केली नाही ना?

अश्वपालकांनो, गैरवर्तवणूक करू नका

● पोलिसांकडून सज्जड इशारा ● माथेरान प्रशासन ॲक्शन मोडमध्ये

प्रीपेड सेवा लवकरच

दस्तुरी येथे पुढच्या सात ते आठ दिवसात प्रीपेड सेवा सुरू करण्याचे सूतोवाच मुख्याधिकारी सुरेखा भणगे-शिंदे यांनी सभेत दिले. पुढील काही दिवसांमध्ये पुन्हा सर्व प्रशासन अधिकाऱ्यांशी चर्चा करून ही प्रीपेड सेवा सुरू केली जाईल, त्यामुळे कोणीही गाडीच्या मागे न धावता नगरपालिकेने बनविलेल्या प्रीपेड सेवा केंद्रामधून नाव नोंदवून नंबरप्रमाणे घोडे पर्यटकांसाठी न्यावे, असे मुख्याधिकारी सुरेखा भणगे-शिंदे यांनी सांगितले.

। माथेरान । वार्ताहर ।

माथेरान प्रशासनाने पर्यटकांची दिशाभूल आणि फसवणूक थांबवा अन्यथा आपला परवाना कायमचा रद्द करण्यात येईल, असा सज्जड इशारा घोडेवाल्यांना देण्यात आला आहे. यावेळी घोडा पासिंग करणे, त्यांना परवाना देण्याबाबत काही अटी व नियम सांगण्यासाठी सभेचे आयोजन करण्यात आले होते.

माथेरानमध्ये प्रवेशद्वार दस्तुरी येथे पर्यटकांची दिशाभूल होते, त्यांना फसवलं जातं, अशा तक्रारी सतत वाढत होत्या. पण, नगरपालिका प्रशासन तसेच पोलीस प्रशासनाकडून कोणतीही कारवाही होत नव्हती. अशा बातम्या अनेक वृत्तपत्रांत प्रसिद्ध होत होत्या. याच अनुषंगाने पोलीस, नगरपालिका, महसूल विभाग, वन विभाग, आरोग्य विभाग तसेच माथेरानमधील दोन्ही अश्वपाल संघटना पदाधिकारी, सर्व अश्वचालक व मालक यांची संयुक्त सभा माथेरान पोलीस ठाण्याच्या प्रांगणात झाली.

या बैठकीला कर्जत तालुका उपविभागीय अधिकारी विजय लगारे, नगरपालिकेच्या मुख्याधिकारी तथा प्रशासक सुरेखा भणगे, वनविभागाचे वनक्षेत्रपाल उमेश जंगम, पशुधन विकास अधिकारी डॉ. अमोल कांबळे, महसूल विभागाचे लिपिक अक्षय जाधव तसेच या सभेचे आयोजन करणारे सहायक पोलीस निरीक्षक शेखर लव्हे, स्थानिक अश्वपाल संघटनेच्या अध्यक्षा आशा कदम, मूळवासीय अश्वपाल संघटनेचे अध्यक्ष संतोष शिंगाडे तसेच बहुसंख्य अश्वपाल उपस्थित होते.

सुरुवातीला घोडेवावाल्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यामध्ये प्रामुख्याने गेली आठ वर्षे दर वाढवला नसल्याने दर वाढवावा असे घोडेवाल्यांकडून सांगण्यात आले. तसेच चढ उतारावर क्ले पेव्हर ब्लॉक लावले आहेत त्यामुळे घोडे त्यावरून घसरत आहेत. ते पेव्हर ब्लॉक काढावे असे ही सांगण्यात आले. तसेच अनेक ठिकाणी घोडा स्टँड नसल्याचे सांगण्यात आले. यावर पुढील काही दिवसात दर निश्चित वाढविले जातील. तसेच क्ले पेव्हर ब्लॉक काढून त्या जागेवर जांभा दगड बसविला जाईल आणि जिथे कुठे घोडा स्टँड हवेत ते बांधण्यात येतील, असे मुख्याधिकारी सुरेखा भणगे-शिंदे यांनी स्पष्ट केले.

महत्त्वाचे

महिलेचा मृत्यू

। नवीन पनवेल । वार्ताहर ।

खोकल्याचे औषध समजून तणनाशक विषारी औषध घेतल्याने पनवेल तालुक्यातील तूरमाळे येथील ४६ वर्षीय महिलेचा हॉस्पिटलमध्ये मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. तूरमाळे येथील सुवर्णा घनश्याम चोरघे यांनी सात मे रोजी खोकल्याचे औषध समजून विषारी औषध प्यायले. त्यांना पनवेल येथील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. १० मे रोजी त्यांचा हॉस्पिटलमध्ये मृत्यू झाला. या घटनेची पनवेल शहर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

'त्या' इसमाचा मृतदेह सापडला

। माणगाव । प्रतिनिधी ।

अभिषेक दत्तु राऊत (४०) मूळ रा. कळमजे, सध्या रा. विलेपार्ले मुंबई याचा मृतदेह माणगाव तालुक्यातील गारळ गावच्या हद्दीत गावाच्या डोंगराजवळ सडलेल्या स्थितीत सापडल्याने एकच खळबळ गारळ गावात उडाली. याबाबतची खबर दत्तु विठोबा राऊत, मूळ रा. कळमजे, ता. माणगाव सध्या रा. विलेपार्ले, मुंबई यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

अभिषेय याला दारूचे व्यसन होते, तो दि. ६ मेपासून बेपत्ता होता. या घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक खिरिट हे करीत आहेत. या घटनेची पनवेल शहर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

बीएसएनएलच्या नादुरुस्त उपकरणांचा आगाराला फटका

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

श्रीवर्धन आगाराला भारतीय संचार निगम मर्यादित सेवेच्या दूरध्वनी उपकरणांची टंचाई याचा चांगलाच फटका बसला असून आगारात दोन व नियंत्रण कक्षात एक असे तीन दूरध्वनी असून, उपकरणे नादुरुस्त अवस्थेत असल्यामुळे प्रवाशांनी आगारात दूरध्वनी केला असता विविध उत्तर ऐकावयास मिळतात. कर्मचाऱ्यांचा संप मिटल्याने आगारातून लांब पल्ल्याच्या तसेच स्थानिक फेऱ्या पूर्ववत झाल्यामुळे गाड्यांचे वेळापत्रक विचारण्यासाठी अथवा आगाऊ आरक्षणासंदर्भात प्रवाशांनी दूरध्वनीवर संपर्क केला असता नियंत्रण कक्षातून दूरध्वनी उचचला जातो. पण, संभाषण व्यवस्थित ऐकू येत नसल्यामुळे प्रवासी गोंधळून जातात. श्रीवर्धन आगारप्रमुख तेजस गायकवाड यांनी सांगितले की, श्रीवर्धन येथील कार्यालयात दूरध्वनी उपकरणांची मागणी करूनसुद्धा उपकरणं मिळत नाहीत. नादुरुस्त उपकरणांमुळे आमच्या कामांना विलंब होत आहे.

> गेल्या काही वर्षांत दूरध्वनीची मागणी घटल्यामुळे उपकरणांची उपलब्धता कमी झाली आहे. ग्राहकाला उपकरणाची आवश्यकता भासल्यास ग्राहक कार्यालयात न येता बाजारातून आपल्या आवडीची उपकरणे खरेदी करतात.
> – रोहित दातार, ज्युनिअर टेलिफोन ऑपरेटर, श्रीवर्धन

मिनीट्रेनच्या मार्गाचे होणार सुशोभिकरण

नॅरोगेजवरील स्लीपर बदलण्यासाठी २० कोटींचा खर्च

मजुरांची मजुरीच तब्बल दीड कोटींच्या घरात

। नेरळ। वार्ताहर।

नेरळ-माथेरान या २१ किलो मीटर लांबीच्या नॅरोगेज रेल्वे मार्गावरील पूर्वी रुळावरून गाडी घसरणे, इंजिन रुळावरून खाली उतरणे असे अपघात होण्याचे प्रमाण वाढले होते. त्यामुळे या नॅरोगेज मार्गावर सिमेंटचे स्लीपर टाकण्याचे काम मध्य रेल्वेकडून मंजूर झाले आहे. त्या कामासाठी मध्य रेल्वे २० कोटी खर्च करणार आहे, तर ते स्लीपर बदलण्याचे काम करणाऱ्या मजुरांवर तब्बल एक कोटी ४० लाख इतका खर्च येणार आहे.

माथेरान येथील पर्जन्यमान लक्षात घेता दरवर्षी मिनीट्रेनच्या नॅरोगेज ट्रकच्या खालील माती वाहून जाण्याचे प्रकार घडत आहेत. त्यात मिनीट्रेनला सुरुवातीच्या काळात मातीचा भराव होता आणि त्याखाली लाकडी स्लीपर होते. कालांतराने त्या ठिकाणी खडी टाकून एक लोखंडी पट्टी असलेले स्लीपर २००० च्या दशकात टाकले गेले आणि त्यावेळी रूळ देखील बदलले गेले होते. असे अनेक उपाय करूनदेखील नेरळ-माथेरान मिनीट्रेनच्या ट्रॅकवर इंजिन रुळावरून घसरण्याच्या समस्या सुटत नव्हत्या.

मध्य रेल्वे ने नेरळ-माथेरान मिनीट्रेन मार्गावर सिमेंटचे स्लीपर बसविण्याचे धोरण हाती घेतले आहे. हे स्लीपर सोलापूर आणि मध्यप्रदेश येथून बनवून आणण्यात आले आहेत. त्यासाठी तब्बल ३७,५०० स्लीपर यांची गरज असून, आतापर्यंत १७ हजार स्लीपर आणण्यात आले आहेत. यासाठी काही कोटी खर्च अपेक्षित आहे. माथेरान मिनिट्रेन २१ किलोमीटर घाटमार्गावर लोखंडी स्लीपर काढून सिमेंटचे स्लीपर लावण्याचे काम सुरू झाले आहे.

वर्षभरानंतर होणार मिनीट्रेन पूर्ववत

सिमेंटचे स्लीपर बसविण्याची मागणी करणारे माहिती अधिकार कार्यकर्ते जनार्दन पार्टे यांनी सिमेंट चे स्लीपर टाकण्यासाठी रेल्वे किती खर्च करणार आहे याबद्दल माहिती मागितली होती. २१ किलोमीटर लांबीच्या अंतरावर सिमेंटचे स्लीपर टाकण्यासाठी रेल्वेकडून ठेका देण्यात आला आहे. त्यानुसार हा ठेका एक कोटी ३८ लाख रुपयांना देण्यात आला आहे. नॅरोगेज मार्गावर ३७५०० स्लीपर टाकण्याचे काम मेसर्स अजय किसान प्रसाद मिश्रा या ठेकेदराला देण्यात आले आहे. तर एक वर्षाच्या आत ते सर्व सिमेंट स्लीपर नॅरोगेज ट्रॅकवर लावावे लागणार आहेत. मात्र, २०२२ च्या अखेरीस किंवा २०२३ मध्ये पर्यटकांची लाडकी मिनीट्रेन नॅरोगेज मार्गावर पुन्हा येणार आहे. त्यावेळी पर्यटकांसाठी प्रवासी वाहतूक सुरु होऊ शकते.

> नवीन सिमेंट स्लीपर टाकल्याने नेरळ-माथेरान-नेरळ मिनीट्रेन अपघातमुक्त होईल, असा विश्वास आहे. त्यामुळे आपण सिमेंट स्लीपर टाकण्याची मागणी करीत होतो. केंद्र सरकारच्या बजेटमध्ये सिमेंट स्लीपर बनविण्यासाठी ५ कोटी २७ लाखांची तरतूद केली आहे.
> – जनार्दन पार्टे, कार्यकर्ते

चिरनेर येथे संभाजी महाराज जयंती

। उरण । वार्ताहर ।

छावा प्रतिष्ठान चिरनेर, युद्धनौका ग्रुप, ग्रामस्थ मंडळ चिरनेर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. १४ मे रोजी उरण तालुक्यातील चिरनेर कातळपाडा येथे छत्रपती संभाजी महाराज जयंती व सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले आहे. संपूर्ण रायगड जिल्ह्यातील एकमेव उरण तालुक्यात छत्रपती संभाजी महाराज जयंती दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. सकाळी ९ वा. छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे इंदुमती कृष्णा नागा कडू यांच्या हस्ते पूजन, सकाळी १० वा. तृप्ती महेश गणेश केणी व रेखा संकेत काळू म्हात्रे यांच्या हस्ते सत्यनारायनाची महापूजा, दुपारी ३:३० वा. शिवबंधू प्रेमी, समस्त शिवभक्त, गणपत महाराज व शिष्यगण यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य पालखी मिरवणूक सोहळा आदी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

मत्स्यदुष्काळामुळे एक महिनाआधीच होड्या किनारी

● कोळी बांधवांवर कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न ● लाखो रुपयांचे नुकसान

। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।

अवकाळी पाऊस व बदलणारे हवामान यामुळे मोठ्या प्रमाणात मासळी मिळणे फार मुश्किल झाले आहे. त्यामुळे यंदा मासेमारी बंदीकाळाच्या एक महिनाआधीच बहुतांश होड्या किनारी विसावल्या आहेत. आठ ते दहा दिवस खोल समुद्रात जाऊनसुद्धा पुरेशी मासळी मिळत नसल्याने मासळी पकडण्याचा खर्चसुद्धा सुटत नसल्याने असंख्य मासेमारी करणारे लोक खूप चिंतेत आहेत. डिझेल खर्च, बर्फ व होडीवर काम करणाऱ्या लोकांची मजुरीसुद्धा सुटत नाही. त्यामुळे हा व्यवसाय कसा करावा, हा मोठा प्रश्न येथे निर्माण झाला आहे.

मुरुड तालुक्यात छोट्या व मोठ्या अशा एकूण ६५० होड्या असून, त्यापैकी निम्यापेक्षा जास्त होड्यांनी किनारा गाठला आहे. निसर्गाशी लढणे आता कोळी बांधवांना कठीण झाले असून, मच्छिमार पूर्णतः हतबल झाले आहेत. १ जूनला शासन मासेमारी न करण्याचे आदेश दिले जातात. त्यावरून साधारणतः २८ मेपासून मच्छिमार होड्या किनाऱ्याला लावत असतात. परंतु, यंदा मासळीच मिळत नसल्याने मच्छिमारांनी स्वतःहून लवकरच होड्या किनाऱ्याला शाकारून पुन्हा मासेमारी न जाण्याचे ठरवल्यामुळे एकदरा पुलाच्या कठड्याला जाळ्या सुकवण्याचे चित्र पहावयास मिळत आहे. म्हणजेच, यंदा किमान एक महिना अगोदर मासेमारीचा काळ समाप्त झाला असून, खूप लवकर मासेमारी संपुष्टात आली आहे.

महेश शिरसेंची सचिवपदी निवड

। सुकेळी । वार्ताहर ।

न्यू महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघटना (कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य) अंतर्गत रायगड जिल्हा कार्यकारिणीचे चर्चासत्र रायगड जिल्हा पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष महादू पाटील तसेच रायगड जिल्हा महिला आघाडी अध्यक्षा साक्षी पलांडे यांच्या उपस्थितीत बाळसई येथे नुकतेच आयोजित करण्यात आले होते.

यावेळी रोहा तालुका पोलीस पाटील संघटनेचे सचिव राम सावंत पोलीस पाटील मुठवळी खुर्द यांच्या सूचनेनुसार न्यू महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघटना रायगड जिल्हा सचिवपदी तामसोली (ता. रोहा) येथील महेश शिरसे यांच्या नावाची शिफारस करण्यात आली.

उरण समुद्रकिनारी बॉम्बसदृश्य वस्तूने खळबळ

। उरण । वार्ताहर।

उरण तालुक्यातील माणकेश्वर समुद्रकिनारी बॉम्बसदृश्य नळकांड्या सापडल्याने उरण परिसरामध्ये खळबळ माजली होती. तपासणीनंतर या कांड्या मोठ्या जहाजांवर सिग्नल देण्यासाठी वापरण्यात येणारे फ्लायर असल्याचे निष्पन्न झाल्याने जनतेने सुटकेचा निःश्वास सोडला.

उरणच्या माणकेश्वर समुद्र किनारी सकाळी दहाच्या सुमारास किनाऱ्यावर खेळणाऱ्या मुलांना काही नळकांड्या सापडल्या. या नळकांड्यांसोबत मुले खेळत असताना एक नळकांडी फुटल्याने या परिसरामध्ये बॉम्बसदृश्य नळकांड्या सापडल्याची माहिती उरण, मोरा पोलीस ठाण्यास देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. नागरिकांनी अशाप्रकारच्या वस्तू आढळल्यास पोलिसांशी संपर्क करण्याचे आवाहन मोरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजित मोहिते यांनी केले आहे.

'अनधिकृत बांधकामे, रस्ते खोदणाऱ्यांवर कारवाई करा'

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यातील कोल्हारे ग्रामपंचायत हद्दीमध्ये सार्वजनिक बांधकाम खात्याच्या रस्त्यावर झालेली अतिक्रमणे हटविण्यात यावीत, कोल्हारे ग्रामपंचायतीच्या नवीन वसाहत भागासाठी नळपाणी योजना मंजूर करावी आणि रस्ते खोदून पाईपलाईन टाकणाऱ्या ग्रामपंचायत पदाधिकारी यांच्यावर कारवाई व्हावी या मागणीसाठी कोल्हारे ग्रामपंचायतीचे सदस्य विजय हजारे हे उपोषण करणार आहेत. दरम्यान, अलिबाग येथील रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयाबाहेर १९ मेपासून उपोषण करणार आहेत.

कोल्हारे येथील सामाजिक कार्यकर्ते विजय रामचंद्र हजारे यांनी नेरळ-कळंब राज्यमार्ग, नेरळ-कशेळे राज्यमार्ग, लोभ्याचीवाडी-पिंपळोली नेरळ प्रमुख जिल्हा मार्ग या रस्त्यालगत झालेले आणि सुरु असलेली अनधिकृत बांधकाम काढून टाकण्यात यावीत. कोल्हारे ग्रामपंचायत हद्दीतील कोल्हार बोपेले धामोते हजारे नगर रामकृष्ण बोपेले साईनगर, कोल्हारे चारफाटा, उमानगर धामोते साईमंदिर परिसरासाठी नवीन नळ पाणीपुरवठा योजना व्हावी आणि एसटी स्टँड रास्ता तसेच त्या रस्त्याला संरक्षण भिंत बांधण्यात यावी आदी मागणीसाठी विजय हजारे यांनी आतापर्यंत २०१७ पासून आजपर्यंत चार वेळा उपोषणे केली आहेत. त्या त्या वेळी उपोषणे सोडताना शासकीय अधिकारी तसेच वरिष्ठ अधिकारी वर्गाने दिलेली लेखी आश्वासने पाळण्यात आली नाहीत.

क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- 407/Pick up वर ड्रायव्हर पाहिजे पगार -१२०००/१५०००/- mo - 8007893232/ 9421954348
- Tally अकाऊंटिंगसाठी मुलगी पाहिजे. ८००७९९३२३२/८००७८९३२३२
- गाळा विकणे आहे. अलिबाग बस डेपो जवळ महावीर चौकात ९९५६७४१३७४/९३७०१२६२५५
- वधू-वर सूचक मंडळ अलिबाग येथे सर्व जातीतील स्थळांची नोंदणी केली जाईल. संपर्क- ८९७५१४२०७९/९८३४९९२५७५ /९८२३८७४३०४.
- शंखेश्वर मेडिकल एजन्सी येथे कामासाठी मुले/मुली हवेत (पिंपळभाट) मो.९३७३७४७३४४
- घर भाड्याने देणे आहे. घर स्वतंत्र बंगला असून चार रुम हॉल किचन सोलर वॉटर सिस्टीम सुविधांसह उपलब्ध आहे. गाडी पार्किंगची स्वतंत्र सोय आहे. संपर्क क्रमांक ८६५७८०६६४२
- अलिबागमध्ये घरकाम मदतनीस- महिला हवी आहे. (संपर्क- ९६५७११८२०० ११ ते ५ मध्ये संपर्क करणे)
- साईश्रद्धा फाऊंडेशनच्या सारळ, वावे, पोयनाड व चौल येथील शाळेसाठी शिक्षिका पाहिजेत. तसेच बांधण येथील स्किल डेव्हलपमेंट सेंटरसाठी कौऊन्सेलर कम क्लार्क, मोबीलायझर व विविध ट्रेडसाठी शिक्षक पाहिजेत. संपर्क : ८३९०९०९४७०/९३९०९०८४७८
- अलिबाग एस.टी. स्टँडसमोर रेडी क्लासरुम इन्फ्रास्ट्रक्चर हॉबी क्लासेस, स्कील डेव्हलपमेंट व इतर कोणत्याही शैक्षणिक वापरासाठी उपलब्ध आहे. संपर्क : ९३९०९०९४७०
- औद्योगिक वापरासाठी औद्योगिक गाळे व प्लॉट तिनवीरा येथील औद्योगिक क्षेत्रात लाईट, पाणी आदी सुविधांसहीत उपलब्ध आहेत. संपर्क - ९३९०९०९४७०
- वर्कशापमध्ये पँकींग व इतर कामासाठी मुलगा पाहिजे. वेळ ८.३० ते ६.३० पगार ८०००/- ठिकाण- बामणसुरे (चोंढी) मो.नं.७८२०८९०३३९
- मला रामनाथ (अलिबाग) ते वरसोली हायस्कूल दरम्यान अर्धा ते एक गुंठ्यामध्ये पत्र्याचे घर असलेले विकत घ्यायचे आहे. तरी कृपया संपर्क करा. फोन नंबर-९१६८५३१६७८

जाहिरातीसाठी संपर्क

☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

सूर निरागस हो...

। अलिबाग । वार्ताहर ।

मैफिल अलिबागतर्फे १४ व १५ मे रोजी दोन दिवसांचा संगीत महोत्सव आयोजित केला आहे. १४ तारखेला अंजली व नंदिनी गायकवाड (इंडियन आयडॉल फेम) या 'स्मरण लता' या कार्यक्रमातून स्व. लता मंगेशकर यांना स्वरांजली वाहणार आहेत. तर, दुसऱ्या दिवशी पं. सतीश व्यास यांचे संतूरवादन व ऋतुजा लाड यांचे शास्त्रीय गायन होणार आहे. पं. सतीश व्यास हे पं. शिवकुमार शर्मा यांचे शिष्य आहेत.

तसं पाहिलं तर या वर्षाची सुरुवातच सांस्कृतिक, सांगितिक, कला क्षेत्राला धक्के देणारी झाली. फेब्रुवारी मधे लतादीदी तर दोनच महिन्यांत, म्हणजे मे महिन्यात पं. शिवकुमार शर्मा यांचं निधन झालं. रत्नजडित हारातील एकेक सुंदर मोती निखळून पडल्यावर हतबलतेची जी जाणीव होते, तीच भावना सध्या रसिकांच्या मनात आहे.

या दोन्ही उत्तुंग व्यक्तिमत्त्वांच्या कलांच्या आठवणींमध्ये रंगून जाण्याचं भाग्य मैफिलमुळे रसिकांच्या दारी आलं आहे. एकीने सात सुरांच्या साथीने कवींच्या शब्दांना न्याय देत एकापेक्षा एक सुरस गाण्यांनी हिमालयाएवढी उंची गाठली, तर हिमालयाच्या कुशीतून आलेल्या पंडितजींनी संतूरसारख्या तंतूवाद्याला हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतात मानाचं स्थान मिळवून दिलं. लताजींनी सुरांच्या क्षेत्रात तर पंडितजींनी संतूरच्या माध्यमातून जनमानसात स्वतः ची मोहोर उठवली आणि दोघांनीही आपापल्या आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण केले. लताजींच्या आवाजातील पहाडी इलाख्यातील गाणी असोत, हिमाचल प्रदेशातील खळखळणाऱ्या नद्यांचे दृश्य असो, दोन प्रेमीयुगुलांच्या प्रेमाची कबुली असो किंवा कोणताही आनंदाचा प्रसंग असो, संतूरच्या पार्श्वसंगीताशिवाय त्याला पूर्णत्व नाही.

॥ मैफिल अलिबागतर्फे दोन दिवसीय संगीत महोत्सव

॥ १४ व १५ मे रोजी पार पडणार कार्यक्रम

पंडितजींमुळे मानाचं स्थान

संतूर हे काश्मीरच्या खोऱ्यात लोकसंगीतात वाजवले जाणारं एक तंतूवाद्य! संस्कृत वाङ्मयात त्याला शततंत्री वीणा म्हटलंय. वीणा, सारंगी, सरोद, सतार, या सगळ्या प्रस्थापित तंतूवाद्यांमध्ये संतूरचा क्रमांक शेवट लागतो. तंतूवाद्यांच्या निर्मितीसाठी विज्ञान लागतं, पण त्यातील कला सादर करण्यासाठी सर्जनशील हातच लागतात. विशेष ओळख नसलेल्या संतूरला हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतात मानाचं स्थान केवळ पंडितजींमुळे मिळालं. आता संतूरशिवाय गाणं ही कल्पनाही कोणाला रुचत नाही.

रसिकांच्या मनावर अधिराज्य

लताजींच्या अलौकिक सूरांत गीतकार, संगीतकार, गायक, कलाकारांच्या अनेक पिढ्या न्हाऊन निघाल्या. पाच दशकांहून जास्त काळ त्यांनी रसिकांच्या मनावर अधिराज्य केलं. लताजींचं कोणतही एक गाणं आवडतं असं म्हणणं म्हणजे दुसऱ्या गाण्यावर अन्याय करण्यासारखं आहे. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांचं गाणं हे आपल्याला आपलं वाटतं हे त्यांच्या गाण्याचं वैशिष्ट्य आहे. या बाबतीत सी. रामचंद्र एकदा म्हणाले होते की, संगीतकाराला काय हवंय ते समजून त्याला हवे ते देण्याची ताकद लताच्याच गळ्यात आहे.

जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाचे मिळकतीबाबत मिळकतीचे मालक श्री. गुरुनाथ रघुवीर मांजरेकर, रा. राधाई निवास, पेण खोपोली रोड, कोंबडपाडा, ता. पेण, जि. रायगड यांचेसोबत मिळकत खरेदी करण्याची बोलणी केलेली असून सदर मिळकत कायम फरोक्त खरेदीखताने विकत घेण्याचे आमचे अशिलांनी ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्र. व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	पो.ख. (हे.आर.)	आकार (रु.पै.)
पेण ग्रामीण	३५९/७	०-०७-१०	०-००-०	१.८१

वरील वर्णनाची मिळकत ही या नोटीसीचा विषय असून सोयीकरीता तिला यापुढे सदर मिळकत असे संबोधिले जाईल.

सदर मिळकत ही विद्यमान मालक यांचे ताबेकब्जाची, वहिवाटीची, निर्वेध, बोजारहीत, विकण्यायोग्य असल्याची हमी मिळकतीचे मुळ मालक यांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तरी सदर मिळकतीवर अथवा तिचे कोणतेही भागावर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबेकब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बक्षिस, बोजा, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, भागीदारी, खरेदीखत, या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी योग्य त्या प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे लेखी स्वरुपात नोंदवाव्यात. या कालावधीत कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकती संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

पेण
ता. १२-०५-२०२२

ॲड. पुष्कर धनदास मोकल
रा. ईशान्य बिल्डींग, बी-विंग, पहिला मजला,
फ्लॅट नं. १०३, महाजन हॉस्पिटलचे बाजूला,
चिंचपाडा, पेण, ता. पेण, जि. रायगड.
मो.नं.९८५०३६११७२, ७७७००९५८३३

अर्जदाराचे वकील
ॲड.एम.जे. तांबडकर

जाहीर नोटीस

मुरुड येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं. ६/२०२२
निशाणी नं. ७/ड
ने.ता. १३/०६/२०२२

१) श्री. वामन धर्मा धारकी,
२) श्रीम. बबिता नागेश हातचांग्या/हातचांगे, **... अर्जदार**
३) श्रीम. कमळू वसंत भगत,

विरुद्ध

कोणीही नाही **... सामनेवाला**

याद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, कै. धर्मा जानू धारकी हे ता. २०/०९/२०१९ रोजी मु. खामदे, पो. सावली, ता. मुरुड, जि. रायगड येथे मयत झाले असून त्यांचे वरील अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांनी अर्जदार यांचे नावे कै. धर्मा जानू धारकी यांचे कायदेशीर वारस असल्याचे सक्सेशन सर्टिफिकेट मागितला आहे. कै. धर्मा जानू धारकी यांचे नाव रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग, शाखा मुरुड या बँकेत असलेले खाते क्र. ६०२१ या खात्यातील रक्कम रु. ३०,७३१,१४/- (रुपये तीस हजार सातशे एकतीस रुपये चौदा पैसे) अधिक त्यावरील व्याजाची रक्कम तसेच रि-इन्व्हेसमेंट डिपॉझिट पावती क्र. ०६४९७८ ची मुदतपुर्ण रक्कम रु. १,४९,३६०/- (रुपये एक लाख एकोणपन्नास हजार तीनशे साठ मात्र) व त्यावरील व्याजाची रक्कम कै. धर्मा जानू धारकी यांचे वारस अर्जदार यांना मिळणेकामी बँकेने अर्जदार यांचेकडे सक्सेशन सर्टिफिकेटची मागणी केल्याकामी अर्जदार यांनी मे. कोर्टास सक्सेशन सर्टिफिकेटची मागणी केलेली आहे.

तरी असा दाखला देणेस कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी तारीख १३/०६/२०२२ रोजी किंवा तत्पूर्वी कार्यालयीन वेळेत मे. कोर्टात हजर राहून आपली हरकत लेखी स्वरुपात द्यावी. मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास या कामी योग्य तो हुकुम करण्यात येईल व मागाहून कोणाचीही हरकत, तक्रार आल्यास तिची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक ११ माहे ०५ सन २०२२ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/-
कनिष्ठ लिपिक
दिवाणी न्यायालय क. स्तर
मुरुड-जंजिरा, रायगड

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
मुरुड-जंजिरा, रायगड

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल शुभलता सुजित शेट्टी यांनी त्या मिळकतीचे मालक श्री. आनंद वासुदेव यादव यांचेकडून खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खाली लिहिलेप्रमाणे :-

मौजे नांदगाव, तालुका कर्जत, जिल्हा रायगड

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै
८७	१/ब	०.१९.७०	०.१८

तदंगभूत सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा-कब्जा, कुळ, वहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी हक्क, मृत्यूपत्रांकितदान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख : १३-०४-२०२२

ॲड. दिपाली राहूल शिंदे,
बी.एल.एस.एल.एल.बी.
ॲडव्होकेट व नोटरी,
मो.नं. ९५६१७१९४९४
९०११७१६००१

Panvel Municipal Corporation, Panvel

जाहीर ई-निविदा सूचना
TENDER

अ.क्र.	कामाबाबतचा तपशील	कामाची मुदत	बयाणा रक्कम	कोरी ई-निविदा फॉर्मची किंमत
1	Selection of Operator For Operations and Management of 72 Bedded COVID Facility at Kalamboli (DCHC/DCH) With Oxygen and ICU Beds at Various Facilities of PMC For the Duration of Six for the Months	सहा महिने किंवा कोविड परिस्थिती नियंत्रणात येईपर्यंत जे लवकर होईल तोपर्यंत	रू. २,५०,०००/-	रू.१०,०००+ १८% (GST सह)

ई-निविदा प्रसिध्देचा तपशील

Stage	Date	time
Publish Date	12/05/2022	At 12:00
Document Download Start Date	13/05/2022	At 15:00
Document Download End Date	26/05/2022	At 15:00
Pre Bid Meeting at PMC Office	17/05/2022	At 11:00
Submission Start Date	12/05/2022	At 15:00
Submission End Date	26/05/2022	At 15:00
Opening Date	27/05/2022	At 15:00

Note- The bidders shall have to submit their bids online and upload the relevant documents as per key schedule (key dates)

Signature of Tenderer Sd/-
Medical officer of Health

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. जयवंत दत्तात्रेय पाटील यांनी खालील वर्णनाची भातशेती मिळकत विकत घेण्याचे ठरवले असून तशी बोलणी चालू आहेत.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नंबर	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)
बेलोशी ता. अलिबाग जि. रायगड	३०१/१	१-०८-५०	२५.७१

सदर वर नमूद मिळकतीवर अन्य कोणाही इसमाचा, संस्थांचा, साठेकरार, बक्षीसपत्र, फरोक्तखत, मृत्यूपत्र, गहाण, तारण, भाडेपट्टा, पोटगी, बँकेची थकबाकी या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी पुराव्यासह आपल्या हरकती खालील पत्त्यावर सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत सादर कराव्यात. सदर मुदतीत अशा प्रकारच्या कोणत्याही हरकती, तक्रार, आमच्याकडे न आल्यास सदरची भातशेती मिळकत निर्वेध, बोजारहीत असून तिचे मार्केटेबल टायटल क्लिअर आहे. असे समजून आमचे अशिल सदरहू मिळकतीचे फरोक्तखत पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १२/०५/२०२२

सही/-
ॲड. नंदकुमार पां. तांबडकर
जिल्हा न्यायालय, अलिबाग
मु.पो. सुडकोली,
ता. अलिबाग, जि. रायगड

अर्जदाराचे वकील
ॲड.एम.जे. तांबडकर

जाहीर नोटीस

मुरुड येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं. ७/२०२२
निशाणी नं. ७/ड
ने.ता. १३/०६/२०२२

१) श्री. वामन धर्मा धारकी,
२) श्रीम. बबिता नागेश हातचांग्या/हातचांगे, **... अर्जदार**
३) श्रीम. कमळू वसंत भगत,

विरुद्ध

कोणीही नाही **... सामनेवाला**

याद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, कै. धर्मुबाई/धर्माबाई जानू धारकी या ता. २१/०८/२०१७ रोजी मु. खामदे, पो. सावली, ता. मुरुड, जि. रायगड येथे मयत झाल्या असून त्यांचे वरील अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांनी अर्जदार यांचे नावे कै. धर्मुबाई/धर्माबाई धर्मा धारकी यांचे कायदेशीर वारस असल्याचे सक्सेशन सर्टिफिकेट मागितला आहे. कै. धर्मुबाई/धर्माबाई धर्मा धारकी यांचे नाव रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग, शाखा मुरुड या बँकेत असलेले खाते क्र. ८३१५ या खात्यातील रक्कम रु. ३०,८४२,२८/- (रुपये तीस हजार आठशे बेचाळीस रुपये अठ्ठावीस पैसे) अधिक त्यावरील व्याजाची रक्कम तसेच फिक्स डिपॉझिट (मुदतठेव) मुदतपूर्ण रक्कम रु. १,३१,२४३/- (रुपये एक लाख एकतीस हजार दोनशे बेचाळीस मात्र) व त्यावरील व्याजाची रक्कम कै. धर्मुबाई/धर्माबाई धर्मा धारकी यांचे वारस अर्जदार यांना मिळणेकामी बँकेने अर्जदार यांचेकडे सक्सेशन सर्टिफिकेटची मागणी केल्याकामी अर्जदार यांनी मे. कोर्टास सक्सेशन सर्टिफिकेटची मागणी केलेली आहे.

तरी असा दाखला देणेस कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी तारीख १३/०६/२०२२ रोजी किंवा तत्पूर्वी कार्यालयीन वेळेत मे. कोर्टात हजर राहून आपली हरकत लेखी स्वरुपात द्यावी. मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास या कामी योग्य तो हुकुम करण्यात येईल व मागाहून कोणाचीही हरकत, तक्रार आल्यास तिची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक ११ माहे ०५ सन २०२२ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/-
कनिष्ठ लिपिक
दिवाणी न्यायालय क. स्तर
मुरुड-जंजिरा, रायगड

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
मुरुड-जंजिरा, रायगड

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. जयवंत दत्तात्रेय पाटील यांनी खालील वर्णनाची वरकस मिळकत विकत घेण्याचे ठरवले असून तशी बोलणी चालू आहेत.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नंबर	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)
बेलोशी ता. अलिबाग जि. रायगड	३०१/२	०-४५-५० पो.ख.०-०९-९० ०-५५-४०	१.१०

सदर वर नमूद मिळकतीवर अन्य कोणाही इसमाचा, संस्थांचा, साठेकरार, बक्षीसपत्र, फरोक्तखत, मृत्यूपत्र, गहाण, तारण, भाडेपट्टा, पोटगी, बँकेची थकबाकी या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी पुराव्यासह आपल्या हरकती खालील पत्त्यावर सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत सादर कराव्यात. सदर मुदतीत अशा प्रकारच्या कोणत्याही हरकती, तक्रार, आमच्याकडे न आल्यास सदरची भातशेती मिळकत निर्वेध, बोजारहीत असून तिचे मार्केटेबल टायटल क्लिअर आहे. असे समजून आमचे अशिल सदरहू मिळकतीचे फरोक्तखत पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १२/०५/२०२२

सही/-
ॲड. नंदकुमार पां. तांबडकर
जिल्हा न्यायालय, अलिबाग
मु.पो. सुडकोली,
ता. अलिबाग, जि. रायगड

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे अशिल सुधागड एज्युकेशन सोसायटी पालीचे अंर्तगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय दादर तर्फे अध्यक्ष यांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत श्री.विठोबा महादेव पाटील रा.दादर ता.पेण जि.रायगड यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे माझे अशिलांचे सदर मिळकतीचे विद्यमान मालक यांचे बरोबर साठेकरार झालेला आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन

तुकडी व जिल्हा रायगड, पोटतुकडी ता.पेण, जिल्हा परिषद रायगड पंचायत समिती पेण, मौजे दादर, ता.पेण, जि.रायगड येथील पड जमिन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं./ गट नं	हिस्सा नं.	क्षेत्रफळ आर चौ.मी	आकार रू.पै.
श्री.विठोबा महादेव पाटील	८३	३	०.५४.७०	५.३२
		पो.ख.	०.०३.७०	
		एकूण	०.५८.४०	

या जमिन मिळकतीपैकी श्री.विठोबा महादेव पाटील यांच्या ताबेकब्जे वहिवाटीतील, हिश्यांतील ०.१५.० हि पड जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही विक्री, साठेकरार, गहाण, दान, बक्षीस, वारसा हक्क, पोटगी, चार्ज ताबा, वहिवाट, लिज, लिन, जमिनकी, कुळहक्क, भाडेपट्टा, कुळमुखत्यारपत्र कोर्ट मॅटर, मृत्युपत्र अथवा अन्य कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत खाली सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी. सदर मुदतीत कोणत्याही प्रकारची लेखी हरकत न आल्यास मिळकतीत कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे तसे गृहीत धरून व मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून मिळकतीचा नोंदणीकृत साठेकराराचा/खरेदीखताचा/लिज चा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळविले.

पेण.
दि.१३/०५/२०२२

ॲड.आर.आर.म्हात्रे
परमार प्लाझा, गाळा नं.९
पेण पोलीस स्टेशन जवळ
ता.पेण, जिल्हा-रायगड
मो.नं.९४२२६८९५९८, ७३५०८११०५५

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

जाहीर नोटीस

अर्जदाराचे वकील -ॲड.संस्कृती शिंदे
फौजदारी चौकशी अर्ज नं.११५/२०२२

माणगांव येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात,

श्री.श्रीकांत मारूती मोंडे अर्जदार

विरूध्द

मा.ग्रामसेवक तथा जन्म आणि मृत्यू सामनेवाला
नोंदणी उपनिबंधक, वगैरे

ज्या अर्थी अर्जदार याची भावजय कै.सुचिता सुर्यकांत मोंडे हिचा दिनांक ०५/०७/२०१० रोजी मौजे पेण तर्फे तळे, ता.माणगांव जि.रायगड येथे मृत्यू झाला असल्याबाबत जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यू दाखला मिळण्याकरीता मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी ज्या कोणाची मयत कै.सुचिता सुर्यकांत मोंडे हिचा मृत्यू दाखला अर्जदारास देण्यास हरकत असेल अगर त्याचे मृत्यूची नोंद ग्रामपंचायत दप्तरी होणेंस हरकत असेल त्यांनी स्वतः अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत दिनांक २१/०६/२०२२ रोजी सकाळी १०:३० वाजता कोर्टात उपस्थित राहून त्यांचे म्हणणे मांडावे. उक्त दिवशी व उक्त वेळी म्हणणे न मांडल्यास पुढील योग्य ते आदेश करण्यात येतील याची नोंद घ्यावी. करीता माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी जाहीरनामा प्रसिद्ध केला.

माणगांव
दिनांक ०६/०५/२०२२

सही/-
कनिष्ठ लिपिक,
प्रथमवर्ग न्यायादंडाधिकारी
माणगांव
ता.माणगांव जि.रायगड

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक,
प्रथमवर्ग न्यायादंडाधिकारी
माणगांव
ता.माणगांव जि.रायगड

जाहीर नोटीस

तमाम जनतेस जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे ताकई ता.खालापूर, जि.रायगड येथील खालील नमुद केलेली जमिन मिळकत ही महसुल रेकॉर्ड प्रमाणे ७/१२ उताऱ्यावरील खालील नमूद केलेल्या जमिन मालकांच्या नावावर असून त्यांच्या मालकीच्या व कब्जेवहीवाटीच्या असून ती निर्वेध बोजारहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस त्यांनी दिलेला आहे. तसेच सदर जमिन मालकांशी खाली नमूद केलेल्या सर्व्हे नंबरची जमिनीशी व्यवहाराची बोलणी झालेली असून सदरचे जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

जमिन मालकांचे नाव	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी एकूण क्षेत्र	आकारणी
श्री.बिज अरूण शहा श्री.कुंजू अरूण शहा	२९/अ/२	२.३३.९० ०.६३.२० पो.ख २.९७.१० एकूण	१४.८०
श्री.बिज अरूण शहा श्री.कुंजू अरूण शहा	३०	०.९५.४० ०.२२.०० पो.ख १.१७.४० एकूण	१.५९

वर नमूद मिळकतीच्या बाबतीत कोणतीही व्यक्ती यांचा इतर कसलाही हितसंबंध, अधिकार, ताबा, पोटगीहक्क, कब्जा, मालकी, वहिवाट, बयाणा, साठेकरार, विक्री, लीज, लीन, चार्ज, मृत्यूपत्र, बोजा, कर्ज, डिक्री, तारण,दान, बक्षिस, कुळवहिवाट, कुलमुखत्यार, खरेदीविक्री, भाडेपट्टा, दावा, मनाईहुकूम, वारसाहक्क, अथवा कोणताही हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे कालावधी मध्ये आपले कागदपत्रासहीत पुराव्याचे सोबत तसे खालील सही करणार वकील यांचे पत्त्यावर प्रत्यक्ष लेखी कळवावे.

वरील दिलेल्या मुदतीत कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या लेखी हरकती आल्या नाहीत तर वरील नमुद मिळकतीवर कोणाचेही कसल्याही प्रकारचे हक्क हितसंबंध व अधिकार नाहीत असे समजण्यात येईल व विद्यमान मालकांचे मालकी हक्क कायदेशीर, निर्वेध निजोखमी व बोजारहीत आहेत असे गृहित धरून न समजून आमचे अशिल पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या हरकतीस आमचे अशिलांवर अगर सदर जमिन मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी. येणेप्रमाणे सदरची जाहीर नोटीस दिली आहे.

ठिकाणः खालापूर
दिनांक : १३/०५/२०२२

सही/-
ॲड. कौशल अ.ताम्हाणे
धानुका आणि पार्टनर्स
ऑ. २२, दुसरा मजला, प्रोस्पेक्ट चेंबर्स,
ॲनक्स ६, फिट रोड, हॉर्नबी रोड, फोर्ट,
मुंबई - ४००००१
मो. ०९९६७६७७९४९
ई मेल : dnp@dhanukaandpartners.co.in
kaushaltamhane@hotmail.com

सही/-
ॲड.अजित विजय मंडलिक
ऑफिस नं.४ श्रीनाथ
अर्पा.श्रीराममंदिरजवळ नेरळ
ता.कर्जत जि.रायगड ४१०१०१
मो.नं.९२२०८३८१८२

कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, रायगड अलिबाग

कार्यकारी अभियंता कार्यालय, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, 'वेदांत' इमारत, रुम नं.०१, तळमजला, पंतनगर चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड पिन-४०२२०१.
office Tel - 02141-292054 Email.mh-rai@pmgsy.nic.in

निविदा सूचना क्रमांक ४/२०२२-२३ (2nd call)

कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, रायगड या कार्यालयातील कार्यकारी अभियंता यांचेसाठी एक वाहन प्रतिमाह दराने भाड्याने घेणेकरीता सिलबंद निविदा मागवित आहोत. दि. १३.०५.२०२२ पासून ते दि. १९.०५.२०२२ पर्यंत निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर निविदेची माहिती वरील कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर उपलब्ध आहे. तसेच कोऱ्या निविदा फॉर्म वरील कार्यालयात उपलब्ध आहेत.

सही/-
कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था
रायगड-अलिबाग

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, मौजे सांडशी ता.कर्जत, जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली बिनशेती जमिन मिळकत आमचे अशिलांनी कब्जेदारांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मौजे.सांडशी ता.कर्जत, जि.रायगड येथील बिनशेती जमिन मिळकत

जमिन मालकाचे नाव	स.नं.	हिस्सा नं./प्लॉट नं	क्षेत्र चौ.मी.	आकार रू.पै.
प्रशांत महेश रूंगटा	४९	२/१	४.८३	४८-३०
टिकवल विरेंद्र शाह	४९	२/२	४.००	४०-००
	४९	२/३	५.४५	५४-५०
	४९	२/४	५.५८	५५-८०
	४९	२/५	४.४४	४४-४०
	४९	२/६	४.८८	४८-८०
	४९	२/७	४.९०	४९-००
	४९	२/८	४.८५	४८-५०
	४९	२/९	४.५३	४५-३०
	४९	२/१०	४.९०	४९-००
	४९	२/११	५.८४	५८-४०
	४९	२/१२	४.८२	४८-२०
	४९	२/१३	३.९७	३९-७०
	४९	२/१४	३९.९१	०-००

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ता.१३/०५/२०२२
मो.नं.९९२१०२३८९४

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
ॲड.योगेश का.देशमुख
मंगलम अपार्ट.मारवाडी पेठ रोड. मज्जीतच्या समोर
गाळा नं.९ कर्जत ता.कर्जत जि.रायगड.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
के. सी. मार्ग, वांद्रे रेक्लेमेशन बस डेपोजवळ, वांद्रे (प), मुंबई – ४०० ०५०
दूरध्वनी क्र.: ०२२ २६५१ ७९३८, **फॅक्स:** ०२२ २६४१ ७८९३ **संकेतस्थळ:** www.msrdc.in
म.रा.र.वि.म. **ई-निविदा पोर्टल:** https://mahatenders.gov.in **ई-मेल:** msrdcnh@gmail.com

(आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धात्मक ई-निविदा प्रस्तावासाठी विनंती)

दिनांक: १२.०४.२०२२

म. रा. र वि. म. मर्या. मुंबई यांनी, खालील कामाच्या पर्यवेक्षणासाठी, महामंडळाचे अभियंता म्हणून प्रकल्प सल्लागार सेवे करिता, पात्र कंपन्यांकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

कामाचे नाव	कामाचे स्वरूप व किमंत	निविदा दस्ताऐवजची किमंत (विना परतावा) + प्रक्रिया शुल्क
महाराष्ट्र राज्यातील, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील रेवस-रेड्डी सागरी महामार्गाच्या संरेखेवर असणाऱ्या (प्र.रा.मा-४) कोलमंडला ते वेश्वी जोडणाऱ्या बाणकोट खाडीवर, बाणकोट पूल व पोहोच रस्त्यांचे उर्वरित बांधकाम ई . पी . सी. तत्वावर आधारीत करणे' या कामाच्या पर्यवेक्षणासाठी, महामंडळाचे अभियंता म्हणून प्रकल्प सल्लागार सेवा देणे.	खाडीवर, पूल व पोहोच रस्त्यांचे उर्वरित बांधकाम करणे, रुपये १७०० मिलियन (रु. १७०.०० कोटी) / १.८३ कि. मी. (पूल + पोहोच रस्ते) लांबी	रुपये दोनशे हजार (रु. २ लक्ष) + रुपये पन्नास हजार फक्त.

पुलाचा तपशील http://mahatenders.gov.in या वेब साइटवर अपलोड करण्यात आलेला आहे.

१. इच्छुक कंपन्या http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर निविदा शर्ती अर्हताचे तपशील पाहू शकतात. पोर्टलवर निविदा शर्तींचे दस्तऐवज शुल्क, ऑनलाइन भरल्यानंतर दि. **१३.०४.२०२२ ते दि. ३०.०५.२०२२, १५:००** वाजेपर्यंत निविदाचे दस्तऐवज डाउनलोड/अपलोड केले जाऊ शकतात.
२. निविदापुर्व बैठक दि. **२८.०४.२०२२ रोजी १५:००** वाजता म. रा. र वि. म. मर्या. कार्यालय वांद्रे (पश्चिम), मुंबई येथे होणार आहे.
३. कोणतेही कारण न देता निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, म. रा. र वि. म. मर्या. यांचे कडे राखून ठेवले आहेत.

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
म.रा.र.वि.म., मुंबई

जाहीर निविदा
ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे
ता.माणगाव जि.रायगड

दि.११/०५/२०२२

ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे, ता.माणगांव, जि.रायगड २०२२/२०२३ अंतर्गत विकास कामांची व साहित्यांची निविदा खालीलप्रमाणे.

अ क्र	कामाचे नाव/साहित्याचे नाव	प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकीय रक्कम	निविदा फी	इसारा रक्कम	ग्रा.प.कडे निविदा सादर करणेचा दिनांक	निविदा उघडण्याचा दिनांक	कामाची मुदत	योजनेचे नाव
१	मुठवली तर्फे तळे प्राथमिक शाळा छप्पर दुरूस्ती करणे	१,२९,९५२/-	२००/-	१३००/-	२३/०५/२०२२ सायं.०५:०० वा	२४/०५/२०२२ सकाळी ११.३० वा	१ महिना	१५ वा वित्त आयोग
२	निवी बौध्दवाडी येथील दोन सीट सार्वजनिक शौचालय दुरूस्ती करणे	७३,६४०/-	२००/-	७३६/-	२३/०५/२०२२ सायं.०५:०० वा	२४/०५/२०२२ सकाळी ११.३० वा	१ महिना	१५ वा वित्त आयोग
३	रा.जि.प.शाळा मुठवली तर्फे तळे शाळागृह दुरूस्ती करणे.	५३,०००/-	२००/-	५३०/-	२३/०५/२०२२ सायं.०५:०० वा	२४/०५/२०२२ सकाळी ११.३० वा	१ महिना	लेखाशीर्ष मागणी क्रमांक ६,२२४५, नैसर्गिक आपत्ती निवारण सहाय अनुदान
४	रा.जि.प.शाळा उमरोली-दिवाळी शाळागृह दुरूस्ती करणे.	१,२००००/-	२००/-	१२००/-	२३/०५/२०२२ सायं.०५:०० वा	२४/०५/२०२२ सकाळी ११.३० वा	१ महिना	लेखाशीर्ष मागणी क्रमांक ६,२२४५, नैसर्गिक आपत्ती निवारण सहाय अनुदान
५	रा.जि.प.शाळा मुठवली आदिवासीवाडी शाळागृह दुरूस्ती करणे.	२,००,०००/-	२००/-	२०००/-	२३/०५/२०२२ सायं.०५:०० वा	२४/०५/२०२२ सकाळी ११.३० वा	१ महिना	लेखाशीर्ष मागणी क्रमांक ६,२२४५, नैसर्गिक आपत्ती निवारण सहाय अनुदान
६	क्षेत्रात निर्जंतुकीरणाकरीता स्प्रेइंग मशीन खरेदी करणे.	७०,०००/-	२००/-	७००/-	२३/०५/२०२२ सायं.०५:०० वा	२४/०५/२०२२ सकाळी ११.३० वा	१ महिना	१५ वा वित्त आयोग

अटी व शर्ती

१. सदर निविदा बाबत अधिक माहिती ग्रामपंचायत मुठवली/तळे येथे कार्यालयीन वेळेत मिळेल.
२. निविदा मंजूर व नामंजूर करण्याचा अधिकार हा सरपंच तथा ग्रामपंचायत मुठवली तळे यांचा राहील. निविदा नामंजूर झाल्यास कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
३. उपलब्ध निधीनुसार देयके आदा करणेत येईल.
४. निविदा सरपंच तथा ग्रामपंचायत मुठवली/तळे ता.माणगांव,जि.रायगड या पत्त्यावर पाठविण्यात याव्या.त निविदा बंद लिफाफ्यात पाठविण्यात याव्यात.
५. देयकातून शासन निर्णयाप्रमाणे कपाती केल्या जातील.
६. अपूर्ण व उशिरा पोहोचलेल्या निविदांचा विचार ग्रामपंचायत करणार नाही.
७. ठेकेदारांनी वर्क ऑर्डर दिलेल्या तारखेपासून मुदतीत काम पूर्ण न केल्यास कोणतेही कल्पना न देता ठेका रद्द करण्यात येईल.

सही/-
ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे
ता.माणगाव जि.रायगड

सही/-
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे
ता.माणगाव जि.रायगड

शिवाजीमहाराज चषक स्पर्धेच्या अनुदानात वाढ

। मुंबई । प्रतिनिधी ।

छत्रपती शिवाजी महाराज चषक स्पर्धेच्या अनुदानात भरघोस वाढ करण्यात आली आहे. त्याबद्दल महाराष्ट्र राज्य कबड्डी असो. चे कार्यकारणी सदस्य व क्रीडाप्रेमी बाबुराव चांदेरे यांच्यावतीने अजित पवार याचे आभार व्यक्त करण्यात आले. शिवशाही चषक या नावाने या स्पर्धेला सुरुवात झाली. आज ती छत्रपती शिवाजी महाराज या नावाने प्रचलित आहे. महाराष्ट्र शासनाच्यावतीने प्रतिवर्षी

राज्य सरकारची घोषणा

वेगवेगळ्या जिल्ह्यात या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. पंचवीस लाख रुपये अनुदान मिळणाऱ्या या स्पर्धेस पवार अर्थमंत्री झाल्यावर पन्नास लाख रुपये अनुदान मंजूर करून घेतले. आज त्यात भरघोस वाढ करून ते एक करोड रुपये करण्यात आली. त्यामुळे क्रीडा जगतात आनंदाचे वातावरण तयार झाले आहे. गेली दोन वर्ष कोरोनामुळे मरगळ आलेल्या खेळाच्या जगतात या घोषणेमुळे उत्साहाचे वातावरण तयार झाले आहे.

या निमिताने क्रीडाप्रेमी बाबुराव चांदेरे यांनी शासनाच्यावतीने थेट नियुक्त करण्यात येणाऱ्या खेळाडू कोट्यातील फाईल प्रलंबित आहेत. अशा ५४ खेळाडूंची यादी पवारांना सादर केली व त्यावर लवकरात लवकर कार्यवाही व्हावी अशी विनंती केली. त्यात सायली केरीपाळे, गिरीश इरणाक, रिशांक देवाडीगा, अभिलाषा म्हात्रे, सोनाली शिंगटे या कबड्डीच्या खेळाडू सोबत, उत्कर्ष काळे, मनीषा दिवेकर, सोनाली तोडणकर, कोमल गोळे हे कुस्तीचे व ११ खो-खो च्या खेळाडूंचा देखील सहभाग आहे. कबड्डी वर्तुळात कबड्डीमहर्षी बुवा साळवी यांच्या निधनानंतर एक पोकळी निर्माण झाली होती, पण पवार घेत असलेल्या खेळाडूंच्या हिताच्या निर्णयामुळे बुवांची ही पोकळी लवकर भरून निघेल असे कबड्डीप्रेमींना वाटू लागले आहे.

बाबा हरदेवसिंहजीचा समर्पण दिवस

चिपळूण खेर्डी : युगद्रष्टा बाबा हरदेवसिंहजी यांचा सर्वप्रिय दिव्य स्वभाव व त्यांचे अलौकिक विचार मानव कल्याणार्थ समर्पित होते. त्यांनी पूर्ण समर्पण, सहनशीलता आणि विशालतेच्या भावनांनी युक्त होऊन ब्रह्मज्ञानाच्या माध्यमातून सत्याचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहचविला आणि विश्वबंधुत्वाच्या संकल्पनेला वास्तविक रूप प्रदान केले. यानिमित्त १३ मे समर्पण दिवसाच्या निमित्ताने चिपळूणमध्ये चितळे मंगल कार्यालय येथे सायं. ६.३० ते ९.०० यावेळेत विशेष सत्संग समारोहाचे आयोजन करण्यात आले आहे.

महत्त्वाचे

अधिकाऱ्याला लुटले

। पनवेल । वार्ताहर ।

बीएमसीतील अधिकारी असल्याचे सांगून तिघा लुटारुंनी नेव्हीतील एका सेवानिवृत्त अधिकाऱ्याजवळची ४५ हजार रुपये किंमतीची सोन्याची चैन जबरदस्तीने लुटून पलायन केल्याची घटना पनवेलमध्ये घडली आहे. पनवेल शहर पोलिसांनी या त्रिकुटाविरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे. या घटनेतील तक्रारदार विजयकुमार शर्मा हे पनवेलच्या तक्का गाव परिसरात राहण्यास असुन ते नेव्हीमधून सेवानिवृत्त झाले आहेत. शर्मा हे आपल्या कारने पत्नीसह रायगड बाजार येथे खरेदीसाठी गेले होते. यावेळी दोघा लुटारुंनी बीएमसीचे अधिकारी असल्याचे सांगुन शर्मा त्यांच्याकडे मास्कबाबत विचारणा केली. शर्मा यांनी देखील त्यांनी मास्क का घातले नाही, असा प्रतिप्रश्न केल्यानंतर त्यांनी साहेबांकडे नेण्याचा बहाणा करुन त्यांना विश्राळी नाका येथील रुशिदा अपार्टमेंटसमोर नेले. त्यानंतर सदर लुटारुंनी लुटालुटीच्या घटना वाढत असल्याचे सांगुन त्यांना पाकीट, घडयाळ व सोन्याची चैन काढुन देण्यास सांगितले.

दुर्पता सौदला बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक

। पनवेल । वार्ताहर ।

महाराष्ट्र राज्य बॉक्सिंग चॅम्पियनशिप सणस मैदान पुणे येथे १ ते ४ मे दरम्यान सब ज्युनियर मुले व मुलींसाठी पार पडली. रायगड जिल्ह्याने २ सुवर्णपदके पटकावली.

३८ किलोमध्ये दुर्पता सौद ऊर्फ छोटीने सातारा, जळगाव येथील बॉक्सर्सचा पराभव केला आणि अंतिम फेरीत पुणे शहराच्या मुलींचा पराभव करन तिने सुवर्णपदक जिंकले तसेच मोस्ट प्रॉमिसिंग बॉक्सर म्हणून तिला सन्मानित करण्यात आले. दुर्पता पनवेल दगडी शाळेत सहावीमध्ये शिकत आहे. बॉक्सिंग प्रशिक्षक

अद्वैत शेंबवणेकर यांच्याकडे आणि माजी ऑलिम्पियन बॉक्सर मनोज पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेते.

मुलांमध्ये सिद्धेश पावसे याने ६१ किलो वजनी गटात अंतिम फेरीत मुंबई क्रीडापीठ अकोला आणि औरंगाबाद येथील बॉक्सर्सचा पराभव करून सुवर्णपदक पटकावले. आदई येथील रहिवासी सिद्धेश पावसे हे सिद्धार्थ वर्मा आणि अद्वैत शेंबवणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आहेत.२० मे ते २५ मे दरम्यान बेल्ह्यारी (कर्नाटक) येथे होणाऱ्या आगामी राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्यासाठी दोन्ही बॉक्सरची निवड करण्यात आली आहे.

यश अँड ओम वॉरिअर्स विजेते

। पाली । वार्ताहर ।

सुधागड तालुकास्तरीय आगरी प्रीमियर लीग २०२२ क्रिकेट स्पर्धा नुकत्याच पालीतील पंचायत समिती कार्यालयासमोरील क्रीडांगणात संपन्न झाल्या. यावेळी क्रिकेट प्रेमी प्रेक्षकांची खुप गर्दी पाहयला मिळाली होती.

या स्पर्धेत यश अँड ओम वॉरिअर्स संघाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. यश अँड ओम वॉरिअर्स या संघाचे मालक

राहुल ठोंबरे व मंगेश ठोंबरे हे आहेत. या संघाला तब्बल चार फूट उंचीचा आकर्षक चषक व रोख पारितोषिक देण्यात आले.

या स्पर्धेत यश अँड ओम वॉरिअर्स संघाने गोलंदाजी, फलंदाजी, क्षेत्ररक्षण या सर्वच क्षेत्रात आघाडी घेतली. त्यामुळे प्रतिस्पर्धी संघाला कोणतीच चुक करण्याची संधी दिली नाही.

विजेत्यांना हा चषक राजेश मपारा याच्या हस्ते देण्यात आला. या विजया बद्दल यश अँड ओम वॉरिअर्स संघाचे सर्वांनी कौतुक अभिनंदन केले. या संघाची विजयाचे सततत्या टिकवून ठेवले.

फुटबॉलचे उन्हाळी प्रशिक्षण शिबिर सुरू

। उरण । वार्ताहर ।

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अलिबाग रायगड व सेव्हन स्टार फुटबॉल अकॅडेमी उरण यांच्या संयुक्त विद्यमाने उरण नगरपरिषद शाळेचे ग्राउंड येथे फुटबॉल ह्या खेळाचे निःशुल्क उन्हाळी प्रशिक्षण शिबिर सुरू करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसियशन उरणचे संस्थापक महादेव घरत, राजू ठाकूर, रवींद्र नाईक ह्यांचा मार्गदर्शनाखाली हे शिबिर आयोजित करण्यात आले. सेव्हेन स्टार फुटबॉल अकॅडेमीचे प्रवीण तोगरे, नंदिनी तोगरे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. पहिल्या दिवशी शिबीराला एकूण ३५ विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

रानमेवा बाजारपेठेत दाखल

। रसायनी । वार्ताहर ।

डोंगरचा रानमेवा म्हणून ओळखली जाणारी, रसाळ, आंबट-गोड डोंगराची काळी मैना करंवद विक्रीसाठी येऊ लागली आहेत. या करंवदांना नागरिकांकडून चांगली मागणी असून १० रुपये वाट्याने त्याची विक्री होत आहे. या विक्रीतून चांगले पैसे मिळत असल्याने आदिवासी बांधव समाधान व्यक्त करत आहेत. थोड्या दिवसांनी करंवदांची आवक वाढणार असून जांभळेही विक्रीला येतील, असे विक्रेत्यांनी सांगितले.

रसायनीलगतच्या कर्नाळा किल्ला आणि पाताळगंगातील घेरामणिक गडाच्या डोंगररांगात अनेक आदिवासीवाड्या आहेत. यातील अनेक आदिवासी बांधवांना खास उपजीविकेचे साधन नाही. या बांधवांना आणि खेड्यातील काही शेतकरी उन्हाळ्यात जांभूळ, करवंद, आंबे, काजू आदी रानमेवा विकून चार पैसे मिळवत असतात. त्याचा त्यांना दैनंदिन खर्चाला चांगला आधार होत आहे. शेतकरी करंवदांच्या झाडाच्या फांद्या शेतीला कुंपण घालण्यासाठी, काही जण जाळण्यासाठी उपयोग करत आहेत. त्यामुळे या झाडांची संख्या घटली आहे. पूर्वी ओढ्याला, छोट्या टेकडीच्या परिसरात मिळणारे करंवदे आता मिळत नाही. त्यामुळे तो दुर्मीळ होत आहे. ही करंवदे शोधण्यासाठी जंगलात जावे लागते. त्यातच निसर्गाच्या लहरीपणामुळे या वर्षी रानमेव्याचे पीक कमी आले आहे. त्यामुळे आदिवासी बांधवांना उदरनिर्वाहासाठी जंगलात रानमेवा जमा करण्यासाठी भटकंती

> **झाडांची संख्या घटू लागली आहे. त्यात हवामान बदलाच्या परिणामामुळे करंवदाचे पीक कमी होऊ लागले आहे. तर जांभळांच्या बहुतेक झाडांना या वर्षी उशीर मोहोर आला. मात्र, १२ ते १५ दिवसांत ते सुद्धा बाजारात विक्रीला येतील.**
> **– सुदाम कडपे, कृषीमित्र, वासांबे मोहोपाडा**

> **बाजारात आलेले काळीभोर, रसाळ आणि आंबट-गोड, जांभूळ, करंवदे हवीहवीशी वाटतात. मधुमेहग्रस्तांनी जांभळे खाणे गुणकारी असते. महाग असले, तरी दरवर्षी ते खरेदी करत आहे.**
> **– सुजाता पाटील, ग्राहक, वासांबे मोहोपाडा**

करावी लागत आहे. सध्या मोहोपाडा बाजारपेठेत करवंद, आंबे विक्रीसाठी येऊ लागले आहे. करवंदांचा वाटा १० रुपयांना असल्याचे आदिवासी विक्रेत्या महिलेने सांगितले.

कल्याणमधील खडी केंद्रासाठी ५.९३ कोटींची चोरी

। कल्याण । प्रतिनिधी ।

कल्याण तालुक्यातील फालेगाव येथील सचिन स्टोन क्रशर या खडी केंद्रासाठी तब्बल ५ कोटी ९३ लाख रुपयांची वीजचोरी झाल्याचे महावितरणच्या भरारी पथकाने उघडकीस आणले. रिमोटद्वारे वीजवापर नियंत्रित करणारे सर्कीट मीटरमध्ये बसवून गेल्या २९ महिन्यांपासून क्रशरचालकाने ३४ लाख ९ हजार ९०१ युनिट विजेची चोरी केल्याचे तपासणीत निष्पन्न झाले आहे.

याप्रकरणी मुरबाड पोलीस ठाण्यात क्रशर मालक व चालक असलेल्या पिता-पुत्राविरुद्ध वीजचोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चंद्रकांत भांबरे व सचिन भांबरे (राहणार फालेगाव, ता. कल्याण) अशी या प्रकरणी गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तींची नावे आहेत. भरारी पथकाने फालेगाव येथील सचिन स्टोन क्रशरच्या मीटरची ५ मे रोजी तपासणी केली. यात मीटरमध्ये छेडछाड केल्याचे व वीज वापराच्या नोंदी संशयास्पद असल्याचे प्राथमिक तपासणीत आढळले.

त्यामुळे मीटर ताब्यात घेऊन प्रयोगशाळेत सखोल तपासणी करण्यात आली. यात मीटरमध्ये काळ्या रंगाची चिकटपट्टी गुंडाळून रिमोट कंट्रोल सर्किट बसवण्यात आल्याचे आढळले. सुरक्षा व अंमलबजावणी विभागाचे कार्यकारी संचालक शिवाजी इंदलकर, उपसंचालक सुनिल थापेकर, कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता धनंजय औंढेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त कार्यकारी अभियंता धनंजय सातपुते, शशांक पानतावणे, सुनिल राठोड, सहायक सुरक्षा व अंमलबजावणी अधिकारी धनंजय कुटे, सहायक अभियंता अतुल ओव्हळ, हेमंत तिडके, तंत्रज्ञ अरुणा नागरे, प्रफुल्ल राऊत, प्रदीप फरद यांच्या पथकाने ही कारवाई केली.

अनधिकृत भाजीविक्रेत्यांसाठी बसथांबाच बदलला

। नवीन पनवेल । वार्ताहर ।

नवीन पनवेल-आदई सर्कल येथील राजीव गांधी मैदानातील फूटपाथवर अनधिकृत भाजीविक्रेत्यांसाठी एनएमएमटीचा बसथांबाकाढूनतोबाजूलाउभारण्यात आला आहे. त्यामुळे कोणीही या, काहीही करा अशी अवस्था मैदान आणि फूटपाथची झाली आहे. पनवेल महानगरपालिका आणि सिडको यापैकी इथे कोण कारवाई करणार, असा सवाल रहिवासी विचारत आहेत.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील नवीन पनवेल-आदई सर्कल येथे मोठ्या प्रमाणात अनधिकृत फेरीवाल्यांनी बस्तान मांडले आहे. मात्र, पालिकेचा अतिक्रमण विभाग कारवाई करत नसल्याने ते सुस्तावले असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. राजीव गांधी मैदानाच्या

आदई सर्कलजवळील घटना

फुटपाथवर अनधिकृत चिकन, मटण विक्रेत्यांनी गेल्या कित्येक वर्षांपासून दुकाने उभारलेली आहेत. तर दुसरीकडे सायकल रिपेरींग, भाजी, फळ विक्रेत्यांनी जागा विकत घेतल्याप्रमाणे याच ठिकाणी पाय पसरले आहेत. येथे धंदे लावण्यासाठी पैसे मोजावे लागतात, असे एका विक्रेत्याने सांगितले. मात्र, हे पैसे कोणाच्या खिशात जातात, याचा खुलासा त्यांनी केला नाही. त्यामुळे या अतिक्रमणाकडे पनवेल पालिकेचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे समोर आले आहे. पालिका आयुक्त गणेश देशमुख यांनी याची चौकशी करून कारवाई करावी व येथील अतिक्रमण उद्ध्वस्त करावे, अशी मागणी स्थानिक करत आहेत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2022)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)